MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष एकविसावे / अंक ४ / एप्रिल २०२०

## संपादकीय

### रॉबर्ट क्लाइव्ह, वॉरन हेस्टींग आणि संस्कृत भाषा

१७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजांची सत्ता भारतात दृढमूल व्हायला लागली. इ.स. १६०० मध्ये व्यापारी म्हणून आलेले इंग्रज हळूहळू राज्यकर्ते व्हायला लागले. त्याआधी भारतामध्ये एकच केंद्रीय सत्ता नसली तरी उत्तरेकडे मोगलांची सत्ता होती, तर दक्षिणेकडे अनेक हिंदू राजे राज्य करीत होते.

१७५७ नंतर पहिला क्रांतिकारक बदल घडला, तो म्हणजे मोगल सम्राट शहा आलम यांनी १७६७ साली ईस्ट इंडिया कंपनीचे प्रमुख रॉबर्ट क्लाईव्ह (Robert Clive) यांना जमिनीचा सारा आणि दिवाणी खटल्यांचे अधिकार बहाल केले. कुठल्याही राज्यव्यवस्थेचे 'महसूल' आणि 'न्याय' हे दोन महत्त्वाचे घटक असतात. व्यापारी कंपनीपासून राज्यकर्ते होण्याकरता लागणारी सर्व साधनेच मुळी मोगल सत्तेकडून ईस्ट इंडिया कंपनीकडे आली. त्यावेळीही बंगाल, बिहार आणि ओरिसा या प्रांतांमधे ब्रिटिश मूठभरच होते. येथेच इंग्रजांचा मुत्सद्दीपणा आणि प्रशासकीय हातोटी कामास आली.

लॉर्ड क्लाइव्ह यांनी त्यावेळी फार महत्त्वाचा निर्णय घेतला. तो निर्णय म्हणजे त्यावेळच्या भारतीय सामाजिक, आणि सांस्कृतिक व्यवस्थेमध्ये कुठलाही हस्तक्षेप न करण्याचा. सारा वसूल करणारी किंवा तत्कालीन न्यायदानाची संपूर्ण रचना आणि व्यवस्था ही भारतीयांकडूनच राबवून घ्यायची, पण त्याची सर्व सूत्रे ईस्ट इंडिया कंपनीच्या हातात ठेवायची. सारा वसूल करीत होते भारतीय, पण तिजोरी भरत होती इंग्रजांची!

याचे व्हायचे ते दुष्परिणाम व्हायला लागले होते. शेतीवर याचा मोठा परिणाम होत होता. १७६९ ते ७३ पर्यंत बंगालमध्ये मोठा दुष्काळ पडला. यामध्ये हजारोंनी बंगाली मृत्युमुखी पडले. १७६७ मध्ये क्लाइव्ह इंग्लंडला परत गेला. पण क्लाइव्ह यांच्या कारकीर्दीमध्ये यंत्रणेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार बोकाळला. या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या अनेक अधिकाऱ्यांनी प्रचंड माया जमा केली. 'नबाब' आणि 'लूट' हे दोन शब्द त्यामुळे इंग्रजी शब्दकोशामध्ये घातले गेले! क्लाइव्हच्या या भ्रष्टाचारी कारकीर्दीची पुढे इंग्लंडमध्ये चौकशीही करण्यात आली. पण भारतामध्ये इंग्रजी सत्ता स्थापन करण्यामध्ये त्याचे कर्तृत्व बघता त्याला निर्दोष सोडण्यात आले. १७६८ मध्ये

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

इंग्लंडमधील रॉयल सोसायटीचे सन्माननीय सदस्यत्व आणि इतरही अनेक मानसन्मान त्याला बहाल करण्यात आले. क्लाइव्हने १७५७ ची प्लासीची लढाई फंदफितुरीने जिंकली होती, आणि त्याची पुढील प्रशासकीय कर्तबगारीही मुत्सद्दीपणाप्रमाणेच, धूर्तपणावरही आधारित होती. मोगली सत्तेला त्यांनी इतके गुंडाळले होते की, मीर जाफर यांनी आपल्या पश्चात ७०,००० पौंड क्लाइव्हला देऊ केले होते. १७७४ मध्ये ४९ व्या वर्षी क्लाइव्हचा मृत्यू झाला. त्याने आत्महत्या केली की त्याचा मृत्यू नैसर्गिक होता याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत.

वॉरन हेस्टींग (Warren Hastings) हा क्लाइव्ह नंतरचा दुसरा मुत्सद्दी इंग्रज अधिकारी. १७५० मध्ये अवघ्या १७ व्या वर्षी तो क्लार्क म्हणून ईस्ट इंडिया कंपनीमध्ये रुजू झाला; व त्याला भारतामध्ये पाठवण्यात आले. बंगाल प्रांतात लहान-मोठ्या अधिकाराची कामं केल्यानंतर १७६४ च्या सुमाराला तो इंग्लंडमध्यें परत गेला. अर्थात त्याच्या या भारतातील कालावधीत तो फारशी माया जमवू शकला नव्हता. इंग्लंडमधील त्याचे राहाणे मात्र विलासी झाले होते, आणि त्यामुळे त्याच्या डोक्यावर कर्जही झाले. रॉबर्ट क्लाइव्हच्या शिफारसीने तो भारतामध्ये १७६९ साली परत आला. १७७१ साली तो कलकत्ता प्रांताचा राज्यपाल झाला. पुढे १७७३ च्या सुमाराला मद्रास आणि मुंबई प्रांताचा कारभारही कलकत्त्याशी जोडण्यात आला. साहाजिकच १७७३ ला तो भारताचा पहिला महाराज्यपाल (Geverner General) म्हणून नियुक्त झाला. १७८५ ला तो इंग्लंडला परत गेला. त्याच्या या दहा-पंधरा वर्षांच्या कारकीर्दीमध्ये इंग्रजी सत्ता भारतात दृढ करण्यामध्ये त्याचे मोठे योगदान आहे.

वॉरन हेस्टींग यांची धोरणंही रॉबर्ट क्लाइव्ह प्रमाणे दुहेरी नीतीची होती. भारतीय सामाजिक, आणि सांस्कृतिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप न करण्याचे त्यांचेही धोरण होते. प्रशासनामध्ये महसुलाप्रमाणेच सर्वात मोठी जबाबदारी ही न्यायव्यवस्थेचीही असते. त्यांचा इंग्रजी न्यायव्यवस्थेप्रमाणे, भारताच्या न्यायव्यवस्थेमध्ये बदल करायला विरोध होता. म्हणून त्यांनी ११ पंडितांची नियुक्ती करून, भारतीय धर्मशास्त्राप्रमाणे एक न्यायिक संहिता हिंदूंकरता लिहून घेतली होती. 'विवादार्णवसेतू' असे त्या संहितेचे नाव होते. तिचे प्रथम पर्शिअनमध्ये आणि नंतर इंग्रजीमध्ये वॉरन हेस्टींग यांनी भाषांतर करून घेतले. भारतीयांवर त्यांच्याच सांस्कृतिक आणि धार्मिक व्यवस्थेप्रमाणे राज्य करण्याच्या धोरणाचाच तो भाग होता. शिवाय ते इंग्रजी भाषेपेक्षा, संस्कृत आणि प्रांतीय भाषांमध्ये राज्यव्यवहार करण्याच्या मताचे होते.

मध्यंतरीच्या पन्नास वर्षांच्या कालावधीत एकंदरीत भारतीय शिक्षणपद्धती आणि सांस्कृतिक व्यवस्था विस्कळीत झाल्या होत्या. संस्कृत भाषेचा अभ्यास आणि शिक्षणाकरता ते कायम आग्रही राहिले. त्यांच्याच प्रेरणा आणि पाठिंब्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी संस्कृत भाषा शिकायला लागले. विल्किन्स हा असाच एक अधिकारी. हेस्टींगच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी भगवद्‌गीतेचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. अशा प्रकारे भाषांतरित झालेले ते भारतातील पहिले पुस्तक होते. त्याच्या पुढे अनेक आवृत्त्या निघाल्या, आणि युरोपमधील अनेक तत्त्वचिंतकांनाही त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख व्हायला मदत झाली. याहीपेक्षा महत्त्वाची घटना म्हणजे, त्यांच्याच प्रेरणेने विल्यम जोन्स यांनी १७८४ साली कलकत्त्याला संस्कृत आणि भारतीय

(पृष्ठ क्र. ४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष एकविसावे/अंक ४/ एप्रिल २०२०

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | चार्ल्स डार्विन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | निमित्त : जागतिक ग्रंथ दिन | प्रा. नारायण बारसे | ६ |
| ४) | निकिता ख्रुश्चेव : भारताचा मित्र व सोव्हिएत संघात उदारमतवाद आणणारा नेता | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १० |
| ५) | आंबा व संस्कृत साहित्य | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १८ |
| ६) | पेव / पुष्करमूळ | श्री. प्रकाश दुधाळकर | २० |
| ७) | विचारांती असे ठरते की .... | श्री. चन्द्रशेखर टिळक | २२ |
| ८) | निर्णय | श्री. स्वप्नील नंदकुमार मयेकर | २६ |
| ९) | लोकशिक्षणामध्ये ग्रंथालयाचे महत्व | मनीषा चव्हाण | २८ |
| १०) | आदिबंध | प्रा. डॉ. सुचित्रा नाईक | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# चार्ल्स डार्विन

*१९ एप्रिल हा चार्ल्स डार्विन या महान शास्त्रज्ञाचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्ताने दिशा मासिकाच्या वाचकांना उत्क्रांतीवादाच्या जनकाचे जीवन आणि कार्य याची माहिती देण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे.– संपादक*

चार्ल्स डार्विन हे एकोणिसाव्या शतकातील एक प्रसिद्ध असे शास्त्रज्ञ होते. त्यांनी जगाला हादरवून टाकणारा क्रांतीकारी असा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडला. त्यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडच्या श्रुशबरी गावात झाला. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने एप्रिल महिन्याच्या दिशा मासिकाच्या अंकात चार्ल्स डार्विन या महान शास्त्रज्ञांबद्दल माहिती द्यावी या उद्देशाने हा लेख लिहिलेला आहे.

चार्ल्स हा आठ वर्षांचा असताना त्याची आई देवाघरी गेली. त्यांच्या मोठ्या बहिणीने त्याचा सांभाळ केला. त्याने आपले शालेय शिक्षण त्याच गावातील शाळेत पूर्ण केले. शालेय शिक्षणात औपचारिक बाबीत त्यांनी फार उत्साह दाखवला नाही. जंगलात फिरायला जाणे, फुलपाखरांचे निरीक्षण करणे, दगड गोळा करणे अशा कामात त्याला आनंद वाटत असे. इतर पालकांप्रमाणेच आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. त्यासाठी त्याने चार्ल्सला १८२५ साली एडिनबर्गला पाठविले. परंतु वैद्यकीय शिक्षणात त्याचे लक्ष लागले नाही. वैद्यकीय महाविद्यालयापेक्षा त्याला शहरातील संग्रहालय जास्त आवडत असे. तिथे जाऊन मेलेल्या पक्ष्यांच्या शरीरात मसाला भरून संग्रहालयात कसे ठेवायचे याचे कसब तो शिकला. वैद्यकीय शिक्षण घेण्यात मुलाला आवड नाही हे लक्षात येताच त्याच्या वडिलांनी त्याला एडिनबर्ग सोडून परत यायला सांगितले. १८२८ साली त्याने केंब्रीज विद्यापीठातील क्राइस्ट कॉलेज मधे प्रवेश घेतला. ते तीन वर्षे महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. औपचारिक शिक्षणाबरोबरच इतर अनेक अनौपचारिक बाबींमध्ये ते लक्ष घालत असत. जॉन स्टिवन्स हन्स्लो यांचेकडून ते वनस्पतीचे संरक्षण कसे करावे याचे धडे घेत असत; तर ॲडम स्मिथ यांचेकडून वेगवेगळ्या दगडांची माहिती घेत असत. फुलपाखरांचा आणि लहानसहान प्राण्यांचा संग्रह करण्याचे काम त्याने सुरूच ठेवले. त्यामुळे, निसर्गाविषयी आस्था असणारी व्यक्ती अशी त्यांची प्रतिमा तयार झाली.



**क्रॉइस्ट कॉलेज, केंब्रीज**

एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीने चांगलेच बाळसे धरले होते. या क्षेत्रात इंग्लंड आघाडीवर होते. औद्योगिक प्रगतीमुळे देशाची आर्थिक स्थिती चांगली सुधारली होती. या संधीचा फायदा घेऊन ब्रिटिश लोक चाकोरीबाहेरची कामे करू लागले होते. इंग्लंड हे एक मोठे बेट आहे. सर्व बाजूंनी ते समुद्राने वेढलेले आहे. देशाच्या बाहेर पडले की समुद्र अशी स्थिती असल्याने ब्रिटिश मंडळी समुद्र सफरीत

व्यक्तिमत्त्व सुंदर नसेल तर दिसण्याला काहीच अर्थ नाही. कारण सुंदर दिसण्यात अन् असण्यात खूप फरक असतो!

तरबेज झाली. यासाठी समुद्र किनारे आणि खोल समुद्र यांची चांगली माहिती असणे त्यांना गरजेचे वाटत होते. दक्षिण अमेरिकेचा समुद्र किनारा हा त्यांचा कुतूहलाचा विषय होता. त्यांचा अभ्यास करण्यासाठी बिगल नावाचे एक जहाज १८२८ मध्ये पाठविण्यात आले होते. या जहाजाचे नेतृत्व करणाऱ्या कॅप्टनचा मोहीम पूर्ण होण्याआधीच मृत्यू झाला. त्यावेळी रॉबर्ट फिट्झरॉय यांनी नेतृत्व स्वीकारले आणि बिगल जहाज सहीसलामत इंग्लंडला परत आणले. ठरलेले काम पूर्ण झाले नाही म्हणून १८३१ मध्ये रॉबर्ट फिट्झरॉय यांच्या नेतृत्वाखाली दुसरी मोहीम करण्याचे ठरले. या कामासाठी जुन्या जहाजाची डागडुजी करण्यात आली. या जहाजावर नेण्यासाठी खलाशी आणि इतर तज्ज्ञ मंडळी निवडण्यात आली. आपल्या चमूत एखादा निसर्ग निरीक्षक असावा अशी फिट्झरॉय यांची इच्छा होती. त्यांचे मित्र जॉन हन्स्लो यांनी या कामासाठी २२ वर्षांच्या चार्ल्सचे नाव सुचविले. चार्ल्स डार्विन यांच्या दृष्टीने ही एक सुवर्णसंधी होती. ती त्यांनी हसतमुखाने स्वीकारली. २७ डिसेंबर १८३१ रोजी प्लायमाऊथ या बंदरातून बिगल जहाजाचे प्रस्थान झाले. ही मोहीम ५ वर्षे चालली. ऑक्टोबर १८३६ मध्ये बिगल जहाज इंग्लंडच्या फालमथ बंदरात परत आले.




**बिगल जहाजाची प्रतिकृती**

आपल्या पाच वर्षांच्या प्रवासात बिगर जहाजाने एक पूर्ण पृथ्वी-प्रदक्षिणा केली. आपल्या प्रवासात ते वेगवेगळ्या बेटांवर थांबत असे. या संधीचा उपयोग करून चार्ल्सने निसर्गाचे बारकाईने निरीक्षण केले. आपल्या बारीकसारीक निरीक्षणाची तो नोंद ठेवत असे. तो परत आला तेव्हा रोजनिशीची ७७० पाने आणि नोंदवहीची एकूण १७५० पाने भरली होती. याखेरीज अनेक ठिकाणांहून त्याने वनस्पती आणि प्राण्यांचे नमुने गोळा केले. त्याला स्वत:ला राहायला बोटीवर तुटपुंजी जागा होती. त्यात भर या नमुन्यांची. ते कमी करण्यासाठी त्याने काही वस्तू लंडनला पोस्टाने पाठविण्याची व्यवस्था केली. असे असले तरी त्याच्या सोबतही बरेच सामान होते.




**बिगल जहाजाचा मार्ग**

बिगल जहाजावरील पाच वर्षांच्या वास्तव्याने चार्ल्सच्या जीवनाला पूर्णपणे कलाटणी दिली. निसर्गाची अनेक गुपिते त्याने स्वत:च्या डोळ्यांनी पाहिली होती. या निरीक्षणांमध्ये सुसूत्रता आणणे आवश्यक होते. त्याने आपले पूर्ण आयुष्य याच कामी खर्च केले. बिगल मोहीमेवरून परत आला तेव्हा तो लंडन शहरात राहात होता. १८३९ साली एम्मा नावाच्या मुलीबरोबर त्याने लग्न केलं. प्रवासातून आणलेल्या सामानासोबत संसार करायला ती जागा अपुरी पडत होती. त्याचबरोबर विचार करण्यासाठी त्याला शहरापासून दूर अशी शांत


जागा हवी होती. त्याच्या श्रीमंत सासऱ्याने त्याची ही गरज पूर्ण केली. लंडन पासून काही अंतरावर असलेल्या डाऊन नावाच्या गावात प्रशस्त आवार असलेला एक बंगला त्यांनी चार्ल्स डार्विनला विकत घेऊन दिला. १८४२ साली चार्ल्स हा डाऊने हाऊस या घरात राहायला आला. १८८२ ला त्याच्या मृत्यूपर्यंत तो येथेच राहिला. ही इमारत आता राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन केलेली आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या इंग्लंड सहलीत आम्ही या स्मारकाला आवर्जून भेट देतो. या भेटीवर आधारित एक लेख दिशा मासिकाच्या जुलै २०१६ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आला होता.



**डाऊने हाऊस**

चार्ल्सने डोळे उघडे ठेवून जी निरीक्षणे केली त्यावरून त्याच्या असे लक्षात आले की, सजीव सृष्टी आज ज्या स्वरूपात आपल्याला दिसते त्या स्वरूपात निर्माण झालेली नाही. पृथ्वीवर आधी अप्रगत अशी सजीव सृष्टी होती तिच्यात क्रमाक्रमाने बदल होत जाऊन आजचे स्वरूप प्राप्त झाले आहे असे त्यांचे मत बनले. त्याचे हे मत प्रचलित धार्मिक मताला छेद देणारे होते. त्यामुळे ते समाजात स्वीकारले जाणार नाही याची त्याला भीती वाटत होती. म्हणून त्याने आपला उत्क्रांतीवादाचा सिद्धांत जगापुढे मांडायला तब्बल २३ वर्षे घेतली. १८५९ साली त्यांनी आपले 'दि ओरिजीन ऑफ स्पेसिस' हे पुस्तक प्रकाशित केले. मधल्या काळात जीवशास्त्रावर विपुल लेखन करून आपले नाव विज्ञान जगतात प्रस्थापित केले. त्याचबरोबर आपल्या म्हणण्याला दुजोरा देण्यासाठी काही प्रयोग केले. समविचारी व्यक्तींबरोबर चर्चा करून आपला एक गट तयार केला. या मंडळींनी त्याची बाजू घेऊन त्याच्या वतीने वादविवादात भाग घेतला. १८६० मध्ये 'ब्रिटिश असोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स' यांनी जेव्हा ऑक्सफर्ड शहरात चर्चेचे आयोजन केले होते तेव्हा अल्डस हक्सले या शास्त्रज्ञाने डार्विनची बाजू मांडली होती.

१८५० च्या दशकात विज्ञानात चांगलीच प्रगती झाली होती. प्रयोगाच्या कसोटीवर आधारलेले निष्कर्ष मान्य करण्याची एक प्रवृत्ती युरोपात निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर डार्विनच्या क्रांतीकारी सिद्धांताला विज्ञान जगतात स्वीकृती मिळू लागली. काही वर्षांतच डार्विनचे नाव जगभर प्रसिद्ध झाले. १८६४ साली रॉयल सोसायटीने कोपले मेडल देऊन त्यांचा सत्कार केला. १८८२ साली जेव्हा त्यांचा मृत्यू झाला तेव्हा सरकारी इतमानाने त्यांना लंडनच्या वेस्टमिन्स्टर ॲबे या दफनभूमीत पुरण्यात आले.



**चार्ल्स डार्विनचा एक संग्रह**

(पृष्ठ क्र.२१ वर)

ना कुणाशी स्पर्धा असावी, ना कुणाच्या पुढे जाण्याची आकांक्षा असावी,
फक्त स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द असावी.

# निमित्त : जागतिक ग्रंथ दिन

*२३ एप्रिल हा जागतिक ग्रंथ दिन या वर्षी वैश्विक पातळीवर उद्भवलेल्या कोरोना विषाणूच्या भीतीच्या सावटाखाली साजरा करावा लागत आहे. या दृष्टीकोनातून लेखकाने आपले मनोगत या लेखात विशद केले आहे- संपादक*

२३ एप्रिल, जागतिक ग्रंथ दिन, महाकवी शेक्सपियर यांचा जन्मदिवस आणि मृत्युदिन. हा दिवस जागतिक ग्रंथ दिन म्हणून साजरा केला जातो. जगभर एखाद्या सणासारखा आठवडाभर हा सोहळा साजरा होत असला, तरी भारतात तेवढ्या धूमधडाक्यात हा दिवस साजरा होत नाही. या वर्षी तर वैश्विक पातळीवर उद्भवलेल्या कोरोना विषाणूच्या भीतीच्या सावटाखाली हा जागतिक ग्रंथ दिन साजरा करावा लागत आहे. कोरोनाच्या भीतीने संपूर्ण जगात हाहाकार माजला आहे. जगातील कुठल्याही देशाला आपल्या सामर्थ्याने पराभूत करू शकतील अशा देशांना सुद्धा जीवनावश्यक औषधे मिळवण्यासाठी भारतासारख्या देशाकडे हात पसरण्याची वेळ आली आहे. एवढ्या भीषण आपत्तीतून संपूर्ण जग जात आहे. जगातील जवळजवळ सर्वच देशांत कोरोना पसरला आहे. जगभर २५ लाखांपेक्षाही अधिक कोरोनाग्रस्त असल्याची नोंद झाली आहे. तर कोरोनाच्या विषाणूची लागण झाल्याने आजपर्यंत १७०००० लोकांनी आपला जीव गमावला आहे. आपल्या देशातही टाळेबंदी लागू असल्यामुळे सर्व नागरिक आपापल्या घरात अडकून पडलेले आहेत. अशा परिस्थितीत काय करावे असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. सुरुवातीचे काही दिवस सुट्टीचा आनंद घेण्यात गेले. परंतु नंतर हळूहळू संकटाचे गांभीर्य लक्षात येत गेले आणि आपण सर्वजण भानावर आलो. मोबाईल आणि व्हाट्सअपच्या माध्यमातून कोरोनाविषयी बरीच चुकीची माहिती, विनोद आणि गैरसमज आपल्यापर्यंत पोहोचत होते. सुरुवातीच्या काळात कोरोना आपल्यापासून खूप दूर आहे आणि आपण एकदम सुरक्षित आहोत अशा अविर्भावात काही दिवस गेले. परंतु जसजसा करोना आपल्या राज्यात, जिल्ह्यात, शहरात आणि आपल्या संकुलात पोहोचल्याच्या बातम्या येऊ लागल्या तेव्हा मात्र सर्वत्र अस्वस्थता पसरण्यास सुरवात झाली. बऱ्याच निकटवर्तीयांबरोबर चर्चा सुरू असताना असे लक्षात आले की, सकाळ संध्याकाळ कोरोनाबद्दलच्या बातम्या पाहून सगळेच मानसिक तणाव अनुभवू लागले आहेत. दूरचित्रवाणी वरील कोणत्याही कार्यक्रमात मन रमेनासे झाले. जुन्या लोकप्रिय मालिकांचे पुनर्प्रसारण सर्वच वाहिन्यांवर सुरू झाले. नवीन मालिकांचे चित्रीकरण बंद असल्याने वाहिन्यांपुढेही प्रश्न उभे राहिले. अनेक वाहिन्यांवरील बातम्या नकोशा वाटायला लागल्या. लॉकडाऊनमुळे दररोजची वर्तमानपत्रे पण येणे बंद झाले. पर्याय म्हणून वर्तमानपत्रांच्या ऑनलाईन आवृत्त्या येऊ लागल्या. या निमित्ताने या सर्वच माध्यमांच्या मर्यादाही स्पष्टपणे जाणवल्या. मग यावर उपाय म्हणून काही उपक्रम हाती घेतले जाऊ लागले. शैक्षणिक क्षेत्रात असलेल्यांनी ऑनलाईन व्याख्याने घेणे व वेबिनारला हजेरी लावणे सुरू केले. काही जण वाचनाकडे वळू लागले. पण सर्वांकडेच ग्रंथ आणि इतर वाचनसाहित्य उपलब्ध नसल्याने त्यांच्यासमोर अडचणी उभ्या राहिल्या. काही जणांनी व्हॉट्सॲपवर एकमेकांना पुस्तकांच्या पीडीएफ पाठवल्या. त्यावरही काहींनी आपला आक्षेप नोंदवला, कारण कॉपीराईट. तरीही अनेक ग्रंथांच्या पीडीएफ स्वरूपातील आवृत्त्याचें ऑनलाईन देवाणघेवाण होतच राहिले. असे असले तरी हे प्रयत्न सर्वांच्याच

वाचनाभिरुचीची तृष्णा भागवणारे निश्चितच नव्हते. प्रत्येकाची वाचनाची आवड-निवड वेगळी असते. अशाच पेचप्रसंगाला आपणही सर्वच सामोरे जात आहोत.

आजच्या तरुण पिढीच्या, विशेषतः विद्यार्थ्यांच्या बाबतीत असे म्हटले जाते की, मोबाईल हेच त्यांच्या शिक्षणाचे आणि करमणुकीचे साधन आहे. बऱ्याचदा मोबाइल गेममुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत असल्याची निरीक्षने देखील नोंदवली गेली आहेत.

अशा प्रकारच्या समस्यांवर मात करण्याचा सध्याच्या घडीला जाणवणार एक उपाय म्हणून माहिती संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित/निर्मित ग्रंथ आणि इतर वाचनसाहित्याचा वापर करता येऊ शकतो. आधुनिक शिक्षण प्रणालीत या स्वरूपाच्या साहित्याचा वाढता वापर हा निश्चितच या साहित्याचे महत्त्व अधोरेखित करीत आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये आणि ज्ञान संक्रमण प्रक्रीयेमध्ये माहितीला अतिशय महत्त्व आहे. माहितीच्या निर्मितीपासून ती योग्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या सर्वच टप्प्यांवर या तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याचे दिसून येते. आणि म्हणूनच मुद्रित आणि दृक्श्राव्य माध्यमांबरोबरच इलेक्ट्रोनिक स्वरूपातील वाचनसाहित्य सर्वच ज्ञानशाखांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पूर्वी वाचनसाहित्य म्हणजे ग्रंथ आणि नियतकालिकांचा प्रामुख्याने समावेश असे. परंतु आधुनिक युगात मुद्रित साधनांबरोबरच अमुद्रित, इलेक्ट्रोनिक, अंकीय (Digital), ऑनलाईन/ऑफलाईन माहितीसंग्रह (Database) यांचा वापर मोठ्याप्रमाणात औपचारिक शिक्षणात विद्यार्थी आणि संशोधक करीत असतात. इंटरनेटच्या माध्यमातून माहिती मिळविण्याकडे जास्त कल दिसून येतो. त्यातही बरेचसे संदर्भ आणि स्रोत गुगलच्या माध्यमातून प्राप्त केले जातात. परंतु ऑनलाईन आणि मुक्त माहिती संग्रहातून मिळवलेल्या माहितीची सत्यता आणि अधिकृतता तपासली जातेच असे नाही. सध्याच्या पिढीला सर्व तत्काळ हवे असते. त्यामुळे गुगलचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. गुगलचे शोध-धोरण-तंत्रेसुद्धा पूर्ण क्षमतेने वापरण्याचे कौशल्य आत्मसात न करताच मिळेल ती माहिती वापरून आपले काम उरकले जाते. या सर्व परिस्थितीला सर्वस्वी विद्यार्थीच जबाबदार आहे असे म्हणता येणार नाही. तर काही अंशी आजची शिक्षण पद्धती आणि अभ्यासक्रम देखील जबाबदार आहे असे वाटते.

महाविद्यालयीन ग्रंथपाल म्हणून गेली २५ वर्षे मी काम करीत आहे. अलीकडच्या काळात सगळीकडे अशी ओरड आहे की, माध्यमांच्या आक्रमणांमुळे, विशेषतः दूरदर्शन, मोबाईल आणि इंटरनेटमुळे तरुण पिढीचा वाचनाचा ओढा कमी झाला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, युटूब, ट्विटर, व्हाटसअप व तत्सम समाजमाध्यमांच्या प्रलोभनांमुळे तरुण पिढीचे वाचन कमी झाले आहे असेही बोलले जाते. असे असले तरी माझा ग्रंथपाल म्हणून अनुभव वेगळा आहे. सात हजार विद्यार्थी संख्या असलेल्या आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या सर्व विभागात मिळून भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांची दररोजची सरासरी संख्या पंधराशेच्या आसपास आहे. परीक्षांच्या काळात ग्रंथालयाचे सर्व विभाग पूर्णक्षमतेने भरलेले असतात. महाविद्यालयाच्या संदर्भ आणि नियतकालिक विभागात कायमच विद्यार्थ्यांची वर्दळ असते. अनेक विद्यार्थी या विभागातील संदर्भ सेवेचा आवर्जून लाभ घेतात. वर्गात शिकताना न समजलेल्या संकल्पनांची उकल करण्यासाठी या विभागातील ज्ञानकोश, विश्वकोश, शब्दकोश, चरित्रात्मक संदर्भ साधने, भौगोलिक संदर्भ साधने, हँडबुक, मॅन्युअल, वार्षिके, स्थलवर्णनकोश, प्रवासी मार्गदर्शिका, इत्यादींचा उपयोग विद्यार्थी अनेकवेळा करताना दिसतात.

---

तुमच्या अपयशाला कवटाळून बसू नका. त्याच्यापासून शिका आणि पुन्हा सुरवात करा.

ग्रंथालयात सर्व विभागात मुक्तप्रवेश असल्याने ग्रंथ आणि वाचक, विद्यार्थी यांच्यामध्ये कोणताही अडथळा नसतो आणि विद्यार्थी तासन्‌तास याविभागात अभ्यासाबरोबरच अभ्यासक्रमांबाहेरील शंकांचे समाधान संदर्भ ग्रंथांमध्ये शोधताना आढळतात. खूपवेळा त्यांना हवी असलेली माहिती मिळवून देण्यास मदत केली तर त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद सहजासहजी टिपता येतो आणि जाताना ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याची पावती म्हणून आभाराचे शब्द नक्की मिळतात. दरवर्षीचा अनुभव तर असा आहे की, काही विद्यार्थी पास झाल्यानंतर ग्रंथालयाला आवर्जून भेट देऊन तोंड गोड करून जातात. बऱ्याचवेळा असेही म्हटले जाते की, आताचे तरुण अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन करीत नाहीत पण हे सुद्धा खरे नाही. नियमितपणे ग्रंथालयात येऊन अवांतर वाचनासाठी ग्रंथांची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. यामध्ये कथा, कादंबरी, चरित्र, आणि आत्मचरित्र, प्रवासवर्णने, पौराणिक कथांवर आधारित साहित्य, परराष्ट्र संबंध, व्यक्तिमत्त्व विकास, राजकीय आणि सांस्कृतिक माहितीपूर्ण ग्रंथ वाचण्याकडे कल दिसून येतो. अनेक विद्यार्थी ब्लॉग-लेखन व वाचन करतात. विद्यार्थीच आपल्या मित्रांना ग्रंथाची माहिती देऊन वाचनाची रुची निर्माण करताना मी पाहिले आहे. आपणास आवडलेला ग्रंथ परत करायला येताना मित्र किंवा मैत्रिणीला सोबत घेऊन येऊन तोच ग्रंथ त्याच्या/तिच्या नावावर घेण्यास सांगून वाचण्याचा आग्रह धरणारे विद्यार्थी सुद्धा दिसून येतात.

महाविद्यालयीन युवक मोबाईलमध्ये मग्न राहून वेळ वाया घालवतात हाही एक गैरसमज आहे, असे मला माझ्या निरीक्षणातून दिसून आले आणि म्हणूनच त्यांच्या वाचन अभिरुचीची मुद्दाम नोंद घ्यावीशी वाटते. आजच्या पिढीच्या वाचकप्रिय लेखकांमध्ये चेतन भगत, अमिष त्रिपाठी, देवदत्त पटनायक, शशी थरूर, सुदीप नगरकर, रॉबिन शर्मा, सावि शर्मा, शेखर कपूर, कविता काणे, शिव खेरा, एकनाथ ईश्वरन, स्टीव्हन कोव्हे, सुधा मूर्ती, ए. पी. जे. अब्दुल कलाम, विवेकानंद, आनंद निळकंठन, एस. एल. भैरप्पा, अश्विनी संघी, गिरीश कुबेर ही काही प्रातिनिधिक नावे आहेत. तरुणाईमध्ये कायम चर्चेत असलेल्या लेखकांचे पौराणिक कथांवर लिहिलेले साहित्य, जग आणि भारताचा इतिहास, संस्कृती, अर्थ, आणि तरुणांचे भावविश्व रेखाटणाऱ्या साहित्याची मागणी ग्रंथालयात नेहमीच केली जाते. बरेच विद्यार्थी फ्लीपकार्ट, अमेझॉन सारख्या साईटच्या माध्यमातून अनेकदा ग्रंथ खरेदी करतात. आपल्या आवडत्या लेखकाचे पुस्तक प्रकाशनाच्या पहिल्याच दिवशी त्या लेखक/लेखिकेच्या सहीनिशी आपल्या हाती पडावे अशा पद्धतीने प्रकाशन पूर्व मागणी विद्यार्थी नोंदवितात. काही लेखकांची पुस्तके वाचली आहेत आणि संग्रही देखील आहेत असे सांगणाऱ्या तरुणांची संख्या सुद्धा मोठी आहे.

पुस्तकांबरोबरच नियतकालिक/संदर्भ विभागात बसून नव-अनुष्टुभ, मुक्तछंद, भाषा आणि जीवन, साधना, ललित, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, इ.पि.डब्लू, फ्रंटलाईन, इंडिया टूडे, इंडिअन लिटरेचर, ओपन, कोम्पिटेशन सक्सेस रिव्ह्यूव इत्यादी नियतकालिके नियमितपणे वाचणारे विद्यार्थी थोड्याप्रमाणात का असेनात पण ग्रंथालयात नेहमीच दिसतात. यापैकी काही विद्यार्थी तर महाविद्यालयात तरुणाईला आकर्षित असलेले कार्यक्रम सुरू असताना सुद्धा ग्रंथालयात मग्न असतात. वृत्तपत्रांच्या साप्ताहिक पुरवणीतील माहिती वाचून ग्रंथालयात नवीन ग्रंथांची मागणी नोंदवणारे, विविध स्पर्धांसाठी पूरक वाचनासाठी पुस्तकांची मागणी करणारे, विद्यार्थी वाचक नेहमीच ग्रंथालयाला अद्ययावत राहण्यास मदत करतात. किन्डल सारखे ग्रंथवाचनासाठीच असलेले गॅझेट देखील विद्यार्थ्यांच्या हातात दिसू लागले आहे. एक

प्रयत्न करणे सोडू नका; तुम्ही आधीच खूप खूप सोसलंय; आता त्याची बक्षीस मिळण्याची वेळ आली आहे!

लाखापेक्षाही अधिक विविध भाषा आणि विषयांची पुस्तके खिशात घेऊन फिरण्याची श्रीमंती देणारे किन्डल म्हणजे ग्रंथव्यवहारातला आणि एकूणच वाचन अभिरुची विकसित करणारा एक चमत्कारच म्हणावा लागेल. पाच ते पंधरा हजारांमध्ये उपलब्ध असलेल्या या गॅझेट लोकप्रियतेची नोंद घेऊन अनेक प्रकाशकांनी आपल्या ग्रंथाच्या किन्डल आवृत्या बाजारात आणल्या आहेत. आणि त्या मुद्रित आवृत्तीपेक्षा तुलनेने स्वस्त सुद्धा असतात. किन्डलचे अजून महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे थ्री जी, वाय फाय आणि त्याचप्रमाणे रात्री आणि दिवसा देखील डोळ्यांना त्रास न होता ग्रंथासारखे वाचण्याची सुविधा होय. थ्री जी आवृत्तीमध्ये कोणत्याही मोबाईल नेटवर्कच्या सेवा न घेता जगभरात आपण कोठेही असलो तरी ग्रंथ डाऊनलोड करता येतात. किन्डलचे मोबाईल ॲप्प सुद्धा आहे. परंतु किन्डल बुक रीडर एवढे ते लोकप्रिय होऊ शकले नाही.

आमच्या महाविद्यालयात अलीकडच्या काळात अंध विद्यार्थ्यांची संख्या बऱ्यापैकी वाढते आहे. पूर्वी एखाद-दुसरा अंध विद्यार्थी असायचा. आता मात्र पाच-दहा अंध विद्यार्थी विविध वर्गात दरवर्षी प्रवेश घेतात. ही संख्या या अर्थाने सुखावणारी आहे की, अंध विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाला प्रवेश घेण्याचे प्रमाण वाढत आहे. आमच्याकडे असणारे हे सर्वच विद्यार्थी अतिशय चौकस आहेत. शुभम पाटील नावाच्या विद्यार्थ्याने माझ्याकडे पाठपुरावा करून डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्याच्या सावि फाऊंडेशनच्या रश्मी पांढरे यांच्या सहकार्याने ब्रेल विभाग ग्रंथालयात सुरू करण्यात सहभाग घेतला. सध्या या विभागात दोनशेच्या वर विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध आहेत. अंध विद्यार्थ्यांना ब्रेल ग्रंथाबरोबरच आणि इतरांच्या मदतीने ग्रंथालयातील इतर वाचनसाहित्याचा लाभ घेता यावा यासाठी ग्रंथालयात कायमस्वरूपी जागा आरक्षित केली आहे. या विद्यार्थ्यांना स्वतःच्या नोट्स काढता याव्यात यासाठी एक ब्रेलर (ब्रेल टाईपराईटर) देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मुलांची वाचनाची भूक भागवण्यासाठी आणि नवीन माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांना दोन संगणक उपलब्ध करून दिले आहेत व त्यावर एन. व्ही. डी. ए. नावाचे मुक्त प्रणाली संगणक वाचन सहाय्यक स्थापित केले आहे. आणि हे विद्यार्थी सर्वसामान्य विद्यार्थ्यासारखे इंटरनेट आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञान सापेक्ष माहिती वाचतात/ऐकतात. विशेष म्हणजे या क्षेत्रात नवीन येणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती त्यांच्याकडे असते.

**असाध्य ते साध्य। करिता सायास।**

**कारण अभ्यास। तुका म्हणे।**

या ओळीप्रमाणे या विद्यार्थ्यांचे प्रयत्न प्रशंसनीय वाटतात.

श्री. स्वागत थोरात संपादित रिलायन्स दृष्टी नावाचे ब्रेल नियतकालिक ही मुले नियमितपणे वाचतात. यापैकी काही विद्यार्थी महाविद्यालयात आणि इतर ठिकाणी होणाऱ्या साहित्य विषयक स्पर्धामध्ये भाग घेतात व बक्षिसेही मिळवतात. अलीकडेच या विद्यार्थ्यांच्या चमूने आकाशवाणी वरील कार्यक्रमात भाग घेतला. त्याची संपूर्ण तयारी मात्र ग्रंथालयात बसून केली. एकंदरीतच, वाचन आणि अद्ययावत माहितीसाठीची या विद्यार्थ्यांची धडपड मला ग्रंथपाल म्हणून प्रेरणा देऊन जाते. आणि नेहमीच काही नवीन उपक्रम करण्याची ऊर्जा त्यांच्याकडून मिळते.

फ्रान्सिस बेकन हा प्रख्यात लेखक म्हणतो...

Reading makes a full man; Conference a ready man; and writing an exact man

(पृष्ठ क्र. २५ वर)

# निकिता ख्रुश्चेव : भारताचा मित्र व सोव्हिएत संघात उदारमतवाद आणणारा नेता

*स्टॅलिन नंतर सोव्हिएत संघात सत्तेवर आलेल्या निकिता ख्रुश्चेव या नेत्याच्या कारकीर्दीतील घडामोडींचा आढावा घेणारा लेख - संपादक*

२१ जानेवारी १९२४ हा दिवस सोव्हिएत संघ या देशाच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस म्हणावा लागेल. कारण या दिवशी व्लादिमीर इलयिच उलयानोव्ह ऊर्फ लेनीन याचा मृत्यू झाला. लेनीन हा रशियातील ऑक्टोबर म्हणजेच बोल्शेविक क्रांतीचा प्रणेता होता. लेनिनची ओळख एक अभ्यासू नेता व प्रभावी वक्ता अशी होती. लेनिनचा जन्म २२ एप्रिल १८७० रोजी सिम्बर्सक (Simbirsk) या शहरात झाला होता. १९२४ साली लेनिनच्या मृत्युनंतर सिम्बर्सक शहराचे नाव लेनिनची आठवण म्हणून उलयानोव्स्क (Ulyanovsk) असे ठेवण्यात आले होते. लेनिन कार्ल मार्क्सच्या लिखाणाने व तत्त्वज्ञानाने प्रभावीत झाला होता. त्यामुळेच बोल्शेविक पक्षाच्या माध्यमातून रशियात क्रांती घडवून आणून मार्क्सचे तत्त्वज्ञान राबविण्याचे त्याचे स्वप्न होते. लेनिनने एक उत्तम संघटना बांधून व एकनिष्ठ कार्यकर्त्यांची व अनुयायांची फळी निर्माण करून ऑक्टोबर १९१७ मध्ये जगाच्या इतिहासात रशियात पहिल्यांदा साम्यवादी क्रांती यशस्वीपणे घडवून आणली. ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीनंतर रशियामध्ये लेनिनच्या नेतृत्त्वाखाली साम्यवादी सरकारची स्थापना झाली. मात्र या सरकारचा मार्ग सुरुवातीच्या काळात फार खडतर होता. साम्यवादाला विरोध करणाऱ्यांनी लेनिनच्या 'लाल बावट्याच्या' सरकारला विरोध केला. लेनिनच्या सरकारच्या या विरोधकांना प्रतिकात्मकरित्या 'श्वेत' म्हणजेच 'पांढरे' असे संबोधले गेले. 'लाल' (साम्यवादी) व 'श्वेत' यांच्यातील यादवी युद्धात साम्यवाद्यांना त्यांच्या 'लाल सैन्याच्या' मदतीने 'श्वेत' विरोधकांना हरवता आले. लेनिन हा सारासार विचार करून योग्य तो निर्णय घेणारा नेता होता. त्याच्याकडे उत्तम वक्तृत्वगुण होता हे आपण पाहिलेच आहे. तसेच, आपले ध्येय साध्य करण्यासाठी तो तात्पुरत्या स्वरूपाची तडजोड करणारा द्रष्टा व चाणाक्ष नेता होता. त्यामुळेच लेनिनने १९२१ साली 'नवे आर्थिक धोरण' (New Economic Policy) स्वीकारले. हे धोरण म्हणजे भविष्यात साम्यवादी विचारसरणी व्यवस्थितपणे राबविता यावी यासाठी केलेली क्षणीक वा तात्पुरत्या स्वरूपाची नीती-वाचा तडजोड होती. या धोरणानुसार काही काळ खाजगी उद्योगधंद्यांना थोड्या प्रमाणात मुभा देण्याचे ठरविण्यात आले होते. या नवीन आर्थिक धोरणाबाबत भविष्यात साम्यवाद रुजविण्यासाठी हे अल्पकालीन स्वरूपाचे टाकलेले पाऊल असे लेनिनचे मत होते.

लेनिनला आपल्या मृत्युपूर्वी कल्पना आली होती की, स्टॅलिन आपले पक्षातील (रशियन साम्यवादी पक्ष) स्थान बळकट करत असून, लेनिनच्या पश्चात सत्ता हस्तगत करण्यासाठी मोर्चेबांधणी करत आहे. लेनिनला व्यक्तीश: स्टॅलिनची एकूणच कार्यशैली पसंत नव्हती. त्यामुळे स्टॅलिनच्या हाती रशियाची सत्ता जाऊ नये असे लेनिनचे मत होते. एवढेच नव्हे तर, स्टॅलिनला रशियन साम्यवादी पक्षाच्या महासचिव पदावरून हटवावे असे लेनिनने सुचविले होते असे काही जाणकार म्हणतात.

असे म्हटले जाते की, अनेकदा इतिहासात आपण विचार करू शकणार नाही अशा आश्चर्यकारक व अनाकलनीय घटना घडत असतात व इतिहास नाट्यमय

वळण घेत असतो. १९२४ साली लेनिनचा मृत्यू झाल्यानंतर रशियाच्या इतिहासात घडलेली अशीच एक घटना म्हणजे स्टॅलिनच्या हातात आलेली सत्ता ही होय. स्टॅलिन १९२४ साली लेनिनच्या मृत्युनंतर रशियाचा सत्ताधीश बनला. अर्थात सुरुवातीच्या काळात त्याला काही लोकांशी जमवून घ्यावे लागले. परंतु अवघ्या काही वर्षांत त्याने आपल्या विरोधकांना निकालात काढले व संपूर्ण सत्ता आपल्या हातात घेतली. १९२४ ते १९५३ या कालावधीत स्टॅलिन रशिया वा सोव्हिएत संघाची ध्येयधोरणे ठरवून ती राबवित होता. या एकोणतीस वर्षांच्या कालावधीत रशिया हा देश व त्या देशातील नागरिक देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक नाट्यमय व उत्कंठावर्धक घटनांचे साक्षीदार बनले. स्टॅलिनने आपल्या कारकीर्दीत रशियात शेतजमीनीचे एकत्रीकरण करण्याचे धोरण अवलंबिले, जड-अवजड उद्योगांना झुकते माप दिले, आधुनिक शस्त्र-सामुग्रीच्या उत्पादनावर भर दिला. स्टॅलिन सत्तेवर असतानाच रशियाला जर्मनी व इतर अक्ष राष्ट्रांविरुद्ध (जर्मनी व तिच्या इटली व जपान सारख्या मित्र राष्ट्रांना दुसऱ्या महायुद्धादरम्यान 'अक्ष राष्ट्र'- इंग्रजीत Axis Powers असे म्हटले गेले) दुसऱ्या महायुद्धात लढावे लागले. २२ जून १९४१ या दिवशी जर्मनीने रशियावर हल्ला केला व रशिया दुसऱ्या महायुद्धात ओढला गेला. जर्मनीने रशियावर जो लष्करी हल्ला केला त्यास 'ऑपरेशन बारबारोसा' असे संबोधले गेले. जर्मनीचा तत्कालीन हुकूमशहा हिटलर याची, रशियाचा निदान पश्चिमेकडील भाग ताब्यात घेऊन तेथे जर्मन नागरिकांच्या वसाहती वसवाव्यात अशी मनीषा होती. त्याचप्रमाणे रशियाच्या दक्षिणेकडील काळ्या समुद्राच्या व कॅस्पिअन समुद्राच्या मध्ये स्थित असलेल्या अर्मेनिया, अझरबैजान व जॉर्जिया अशा प्रदेशांतील तेलाच्या स्रोतांवर ताबा मिळवावा ही योजना होती. हिटलरची ही भव्यदिव्य स्वप्ने रशियाने स्टॅलिनच्या नेतृत्त्वाखाली उधळून लावली. स्टॅलिनने दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आपले नेतृत्वगुण निर्विवादपणे सिद्ध केले यात वाद नाही. युद्धकाळात त्याने क्रेमलीन (रशियन राष्ट्राध्यक्षांचे रशियाची राजधानी मॉस्को येथील निवासस्थान) सोडण्यास नकार दिला. यातून तो धैर्यशील पुरुष होता हे निदर्शनास आले. दुसऱ्या महायुद्धादरम्यान स्टॅलिन रेडिओवरून लोकांना संबोधून भाषण करत असे. दुसऱ्या महायुद्धात रशियाच्या भूमीवर जर्मन व रशियन सैन्यात लढली गेलेली सर्वात रक्तरंजक लढाई म्हणजे स्टॅलिनग्राडची लढाई होय. ही लढाई २३ ऑगस्ट १९४२ ते २ फेब्रुवारी १९४३ या कालावधीत लढली गेली. हिटलरने जर्मन सैन्याला कुठल्याही परिस्थितीत स्टॅलिनग्राडमधून मागे न हटण्याचे आदेश दिले होते तर स्टॅलिननेही या लढाईत रशियन सैन्याला इंच इंच जमीन लढविण्याचे फर्मान सोडले होते. हिटलर स्टॅलिनचे नाव असणाऱ्या स्टॅलिनग्राड या शहराचा पाडाव करण्यासाठी व ते जिंकण्यासाठी ईरेला पोचला होता. मात्र, रशियन सैनिकांनी व जनतेने जर्मन सैन्याचे सगळे मनसुबे उधळून लावले. वॅसिली इवानोविच चुकॉव (Vasily Ivanovich Chuikov) सारख्या रशियन लष्करी अधिकाऱ्यांनी रशियन सैन्याला स्टॅलिनग्राडच्या लढाई दरम्यान त्यांचा आत्मविश्वास वाढवून लढाई जिंकण्यासाठी योग्य मार्गदर्शन केले. स्टॅलिनग्राडच्या लढाईत जर्मनीचा पराभव झाला व ही लढाई दुसऱ्या महायुद्धाला कलाटणी देणारी ठरली. रशियन सैनिकांच्या शौर्यासमोर जर्मन अत्याधुनिक युद्धयंत्रणेला नांगी टाकावी लागली व पराभवाला सामोरे जावे लागले. स्टॅलिनग्राडच्या रशियन विजयामुळे एकंदरीतच मित्रराष्ट्र राष्ट्रांचा आत्मविश्वास उंचावण्याचे काम केले. इतिहासकारांच्या मते या लढाईनंतर दुसऱ्या महायुद्धात जर्मनीची खऱ्या अर्थाने पीछेहाट होऊ लागली व शेवटी ८ मे १९४५ रोजी जर्मनीला दुसऱ्या महायुद्धात पराभव स्वीकारावा लागला. तत्पूर्वी ३० एप्रिल १९४५ रोजी जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या गर्तेत लोटणाऱ्या व लाखो

ज्यूंची कत्तल करणाऱ्या हिटलरने आपली पत्नी इव्हा ब्राऊन हिच्यासोबत आत्महत्या केली.

दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत संघ एक महासत्ता म्हणून पुढे आला. तर अमेरिका ही जगातील दुसरी महासत्ता बनली. साधारणतः १७ व्या शतकापासून जगात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या व १९ व्या शतकाच्या मध्यापासून जगाच्या विविध भागांत वसाहती निर्माण करून आपले साम्राज्य उभारणाऱ्या इंग्लंड व फ्रान्स या देशांची दुसऱ्या महायुद्धानंतर पीछेहाट झाली. या देशांनी दुसऱ्या महायुद्धानंतर एकापाठोपाठ एक आपल्या वसाहती तर गमावल्याच, परंतु त्यांच्यावर अमेरिकेसारख्या महासत्तेवर स्वसंरक्षणासाठी विसंबून राहण्याची वेळ आली. इंग्लंडला तर एकेकाळी त्यांच्या सम्राटाच्या/सम्राज्ञीच्या राजमुकुटातील 'सर्वात तेजस्वी रत्न' (the brightest jewel) म्हणून ज्याचे वर्णन केले जाते तो भारत देखील गमवावा लागला. भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश राजवटीतून मुक्त झाला. दुसऱ्या महायुद्धात अमेरिका व रशिया दरम्यान प्रस्थापित झालेली मैत्री दुसऱ्या महायुद्धानंतर टिकू शकली नाही. युद्ध संपल्यानंतर अमेरिका व सोव्हिएत संघादरम्यान शीतयुद्धाला सुरुवात झाली. शीतयुद्ध म्हणजे एक प्रकारच्या विचारधारेवर आधारित अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन देशांमधील व त्यांना पाठिंबा असणाऱ्या देशांच्या दोन गटांमधील तणाव होता. अभ्यासकांच्या मते स्टॅलिनने दुसरे महायुद्ध संपल्यानंतर लागलीच पूर्व युरोपातील देशांमध्ये जो साम्यवादी राजवटी प्रस्थापित करण्याचा सपाटा लावला व त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी 'मार्शल योजना' (युरोपातील देशांना अमेरिकन आर्थिक मदत देण्याची योजना. ही योजना युरोपातील देशांना साम्यवादाकडे झुकण्यापासून रोखण्यासाठी व सोव्हिएत संघाला शह देण्यासाठी आखण्यात आली होती) आखली व युरोपमधील विविध देशांना आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. तसेच अमेरिका एखाद्या देशाच्या इच्छेविरुद्ध कुठल्याही बाह्य शक्तीला (येथे सोव्हिएत संघ असे वाचावे) तत्सम देशातील साम्यवाद्यांना खतपाणी घालून व सर्वोतोपरी मदत करून तेथील सरकारे उलथवून लावून साम्यवादी शासनप्रणाली स्थापित करू देणार नाही असे जाहीर केले. ट्रुमन यांची ही घोषणा म्हणजे जगात अमेरिका व सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये शीतयुद्ध सुरू झाल्याची नांदी होती.

स्टॅलिनच्या काळात रशियातील अंतर्गत राजकीय वातावरण पूर्णतः ढवळून निघाले. स्टॅलिनने आपल्या राजकीय विरोधकांचा रितसरपणे काटा काढला. स्टॅलिनला विरोध करणाऱ्या व त्याला ज्यांच्यावर संशय येत असे अशा नेतेमंडळींचा रीतसरपणे खातमा केला जात असे. स्टॅलिनने अशाचप्रकारे आपल्या मार्गातून बाजूला केलेल्या एका नेत्याचे नाव म्हणजे लिऑन ट्रॉट्स्की हे होय. ट्रॉट्स्की हा एक हुशार व बुद्धीमान नेता तर होताच, पण सोबतच तो एक उत्तम वक्ता होता. रशियन साम्यवादी पक्षात सर्वसाधारणपणे अशी समजूत होती की, लेनिननंतर साम्यवादी रशियाची सत्तासूत्रे ट्रॉट्स्कीकडे जातील. परंतु नियतीच्या मनात काही वेगळेच होते. ऑक्टोबर १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या व क्रांतीनंतर यादवी युद्धादरम्यान साम्यवादी राजवटीला विरोध करणाऱ्या रशियनांचा (रशियातील साम्यवादी राजवटीला विरोध करणाऱ्यांचा प्रतिकात्मकरित्या 'श्वेत' असा उल्लेख केला जात असे) 'लाल सैन्याच्या' मदतीने बीमोड करणाऱ्या ट्रॉट्स्कीला १९२८ च्या जानेवारी महिन्यात प्रथम कझाकस्तानात हद्दपार करण्यात आले व नंतर १९२९ साली रशियातूनच हद्दपार केल्यामुळे त्याला तुर्कस्तानात जावे लागले. त्यानंतर ट्रॉट्स्की काही काळ युरोपमधील फ्रान्स व नॉर्वे या देशांमध्ये राहिला व शेवटी तो उत्तर अमेरिका खंडातील मेक्सिको या देशाच्या राजधानीच्या मेक्सिको सिटी या शहरात राहू लागला. २० ऑगस्ट १९४० रोजी रशियन

गुप्तचर संघटनेच्या सदस्याने ट्रॉट्स्कीवर बर्फ तोडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कुऱ्हाडीच्या सहाय्याने हल्ला केला (अशा कुऱ्हाडीचा वापर साधारणपणे गिर्यारोहक करत असतात). ट्रॉट्स्कीला इस्पितळात हलविण्यात आले. परंतु पुढच्याच दिवशी म्हणजेच २१ ऑगस्ट १९४० रोजी ट्रॉट्स्कीचे निधन झाले.

आपण अगोदर नमूद केल्याप्रमाणे, १९२४ ते १९५३ या कालावधीत स्टॅलिन सोव्हिएत संघ वा रशियाचा सर्वेसर्वा होता. ५ मार्च १९५३ रोजी स्टॅलिनचा मृत्यू झाला. स्टॅलिनच्या मृत्युनंतर काही काळ मॅलेनकोव, ख्रुश्चेव व वोरोशिलोव हे त्रिकूट सोव्हिएत संघाचा एकत्रितरित्या कारभार पाहत होते. या तिघांना बेरिया, बुल्गानिन व मोलोटोव यांची देखील साथ होती. मॅलेनकोव मंत्रीमंडळाचा अध्यक्ष म्हणजेच पंतप्रधान बनला. ख्रुश्चेवकडे रशियन साम्यवादी पक्षाची जबाबदारी आली तर वोरोशिलोवला रशियन साम्यवादी पक्षातील निर्णय घेणाऱ्या सर्वोच्च मंडळाचे अध्यक्षपद देण्यात आले.

जॉर्जी मॅक्सीमिलानोविच मॅलेनकोव याचा जन्म ८ जानेवारी १९०२ रोजी दक्षिण सैबेरियातील ओरेनबर्ग येथे झाला. ओरेनबर्ग हे उराल (Ural) नदीच्या तीरावर वसलेले शहर आहे. (उराल नदी ही युरोप खंडातील तिसरी मोठी वा लांब नदी आहे. ही नदी २४२८ किलोमीटर्स एवढी लांब असून कॅस्पिअन समुद्राला जाऊन मिळते. वोल्गा (Volga) ही युरोप खंडातील सर्वात मोठी नदी असून ती ३५३१ किलोमीटर्स एवढा दीर्घ प्रवास करून कॅस्पिअन समुद्राला मिळते. युरोपमधील दुसऱ्या क्रमांकाची लांब नदी म्हणजे डॅन्यूब वा डॅन्यूबे (Danube) ही होय, ही नदी जर्मनीत उगम पावते व युरोपमधील जवळ जवळ दहा देशांतून वाहते व या नदीची लांबी २८५० किलोमीटर्स एवढी आहे). मॅलेनकोवने लेनिन व स्टॅलिन या दोहोंसोबत जवळून काम केले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्टॅलिनने मॅलेनकोवला रशियाच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाची जबाबदारी दिली होती. ख्रुश्चेवने १९५५ मध्ये मॅलेनकोवला पंतप्रधानपद सोडण्यास भाग पाडले. १९५७ साली मॅलेनकोवने ख्रुश्चेवविरूद्ध षडयंत्र करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याला कझाकस्तानला हद्दपार करण्यात आले. १९६१ मध्ये मॅलेनकोवची रशियन साम्यवादी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. १४ जानेवारी १९८८ रोजी मॅलेनकोवचे वयाच्या शहाऐंशिव्या वर्षी रशियाची राजधानी मॉस्को येथे निधन झाले.

क्लिमेंट येफ्रेमोविच वोरोशिलोव याचा जन्म ४ फेब्रुवारी १८८१ रोजी युक्रेनमधील बखमूट (Bahmut) येथे झाला. बखमूट हे शहर बखमूटका (Bakhmutka) नदीच्या तीरावर वसलेले आहे. वोरोशिलोव हा मूलतः लष्करी अधिकारी होता. त्याला सोव्हिएत संघातील 'मार्शल' ही अत्युच्च पदवी वा किताब देण्यात आला होता. असे म्हटले जाते की, सोव्हिएत संघातील पहिल्या पाच 'मार्शल्स' पैकी वोरोशिलोव हा एक होता व इतर चौघांची नावे तुखाचेवस्की (Tukhachevsky), बूडीयॉनी (Budyonny), ब्लॅयुखेर (Blyukher) व येगोरोव (Yegorov) अशी होती. १९५३ च्या मार्च महिन्यात वोरोशिवला प्रेसिडिअम (Presidium) चे अध्यक्षपद देण्यात आले. हळूहळू ख्रुश्चेवचा प्रभाव वाढत गेला व अनेक मोठ्या नेत्यांचे महत्त्व कमी करण्यात येऊ लागले. तसेच त्यांना पदावरून हटविण्यात येऊ लागले. अशा नेत्यांपैकी वोरोशिलोवदेखील एकजण ठरला. १९६० च्या मे महिन्यात वोरोशिलोवने आपल्या प्रेसिडिअमच्या अध्यक्षपदाचा स्वेच्छेने राजीनामा दिला (त्याला राजीनामा देण्यास भाग पाडले असे म्हणणे योग्य ठरेल). नंतरच्या काळात ख्रुश्चेवला पदावरून हटवून सत्ता हातात घेतलेल्या ब्रेझनेव (Brezhnev) ने वोरोशिलोवचे राजकीय पुनर्वसन केले व वोरोशिलोव १९६६ मध्ये रशियन साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीवर निवडला गेला. २२ फेब्रुवारी १९६८ रोजी वोरोशिलोवला 'हिरो ऑफ द सोव्हिएट

---

जीवनात त्रास त्यांनाच होतो जे सतत जबाबदारी स्वीकारतात आणि जबाबदारी स्वीकारणारे कधीच हरत नाहीत. एकतर ते जिंकतात किंवा काहीतरी शिकतात!

युनियन' हा किताब देऊन सन्मानित करण्यात आले. १९६८ मध्ये त्याला हा किताब दुसऱ्यांदा मिळत होता. वोरोशिलोवला सदर किताब पहिल्यांदा ३ फेब्रुवारी १९५६ रोजी मिळाला होता. 'हिरो ऑफ द सोव्हिएट युनियन' हा सोव्हिएत संघातील सर्वोच्च किताब होता. हा किताब सोव्हिएत संघाप्रती व तेथील समाजाप्रती शौर्यपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना देण्यात येत असे. वोरोशिलोवचे १९६९ मध्ये सोव्हिएत संघाची राजधानी मॉस्को येथे निधन झाले.

लॅवरेन्टिय पावलोविच बेरिया याचा जन्म २९ मार्च १८९९ रोजी अब्खाझिया (Abkhazia) मधील मेरख्यूली (Merkheuli) गावात झाला होता. बेरियाची स्टॅलिनसोबत चांगलीच जवळीक होती. बेरिया स्टॅलिनसोबत याल्टा येथे झालेल्या परिषदेस उपस्थित होता. ही परिषद दुसऱ्या महायुद्धादरम्यान क्रिमियातील याल्टा या ठिकाणी ४ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी १९४५ या काळात पार पडली होती व या परिषदेला अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलीन रुझवेल्ट व इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान विन्स्टन चर्चिल हे देखील उपस्थित होते. बेरिया हा रशियातील अतिशय खतरनाक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गुप्त पोलिस खात्याचा प्रमुख होता. स्टॅलिनच्या मृत्यू पश्चात बेरिया सोव्हिएत संघाचा 'प्रथम' उपपंतप्रधान बनला. बेरियाला जून १९५३ मध्ये त्याच्या पदावरून हटविण्यात आले. त्याच्याविरोधात देशद्रोह व बलात्काराचे आरोप लावण्यात आले. बेरियाला पदावरून हटविण्यात सोव्हिएत संघाच्या लष्कराचे चीफ ऑफ द जनरल स्टाफ (Chief of the General Staff) हे सर्वोच्च पद, मार्शल ऑफ द सोव्हिएत युनियन (Marshal of the Soviet Union) व संरक्षण मंत्री ही पदे भूषविलेल्या, तसेच पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या जॉर्जी कोन्सटानटिनोविच झुकॉव (Georgy Konstantinovich Zhukov) याने ख्रुश्चेवला मदत केली होती. बेरियाला शेवटी २३ डिसेंबर १९५३ रोजी मृत्युदंड देण्यात आला. ज्या व्यक्तीने बेरियाला ठार केले त्याचे नाव पॅवेल फ्योदोरोविच बॅटिट्स्की (Pavel Fyodrovich Batitsky) असे होते. बॅटिट्स्की १९२४ पासून रशियाच्या लाल सैन्यात होता. १९६६ ते १९७८ या कालावधीत तो सोव्हिएत संघाच्या वायुदलाचा म्हणजेच वायुसेनेचा सरसेनापती होता. त्याचा 'हिरो ऑफ द सोव्हिएट युनियन' व 'मार्शल ऑफ द सोव्हिएट युनियन' या किताबांनी देखील सत्कार करण्यात आला होता.

व्याचेस्लाव मिखाईलोविच मोलोटोव (Vyacheslav Mikhailovich Molotov) हा १९५३ ते १९५६ या कालावधीत परराष्ट्र मंत्रालयाचा प्रमुख होता. त्याचा जन्म ९ मार्च १८९० रोजी किरोव ऑबलॉस्ट मधील (Kirov Oblost- रशियात प्रांताला ऑबलॉस्ट असे म्हटले जाते) कुरकरा (Kurkara) या ठिकाणी झाला. कुरकरा हे शहर सोवेट्स्क (Sovetsk) या नावाने देखील ओळखले जाते. मोलोटोव हा १९४२ ते १९५७ या कालावधीत प्रेसिडिअमचा सदस्य होता. त्यापूर्वी १९३० ते १९४१ या कालावधीत तो पंतप्रधान होता. १९६२ च्या आसपास जेव्हा ख्रुश्चेव आपले स्थान बळकट करत होता तेव्हा मोलोटोवला रशियन साम्यवादी पक्षातून काढून टाकण्यात आले. मोलोटोवला त्याच्या पूर्ण आयुष्यात एकूण सात वेळा हृदयविकाराचे झटके आले! मोलोटोव वयाच्या शहाण्णवाव्या वर्षी ८ नोव्हेंबर १९८६ रोजी इस्पितळात निधन पावला. असे म्हटले जाते की, १९८६ मध्ये मृत्युसमयी मोलोटोव हा बोल्शेविक क्रांतीत सहभागी झालेला सर्वात वयस्कर नेता होता.

निकोलाय अलेक्झांड्रोविच बुल्गानिन (Nikolai Alexandrovich Bulganin) देखील सोव्हिएत संघात स्टॅलिनच्या मृत्युपश्चात निर्माण झालेल्या सत्तेच्या

---

माझा प्रयत्न इतरांपेक्षा श्रेष्ठ असला पाहिजे असं नाही, पण जो मी काल होतो त्यापेक्षा आज अधिक चांगला हवा.

समीकरणातील अजून एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. बुल्गानिनचा जन्म ३० मे १८९५ रोजी निझ्नी नोवगोरोड (Nizhny Novgorod) येथे झाला होता. निझ्नी हे रशियातील प्रसिद्ध लेखक मॅग्झीम गोर्की याचेदेखील जन्मस्थान होय. मॅग्झीम गोर्की लिखित 'आई' (The Mother) ही कादंबरी २० व्या शतकाच्या सुरुवातीस खूपच गाजली होती. १९९० सालापर्यंत निझ्नी हे शहर 'गोर्की' या नावाने देखील ओळखले जात असे. अर्थात गोर्की हे नाव मॅग्झीम गोर्कीच्या नावावरून ठेवण्यात आले होते. बुल्गानिन हा ख्रुश्चेवचा निकटवर्ती म्हणून ओळखला जात असे. बुल्गानिन व ख्रुश्चेवने एकत्रितपणे अनेक देशांना भेटी दिल्या होत्या. बुल्गानिन व ख्रुश्चेवने १९५५ सालात भारताला भेट दिली होती. असे म्हटले जाते की, त्यांच्यात कितीही जवळीक वाटली तरी ख्रुश्चेवचा बुल्गानिनवर पूर्ण विश्वास नव्हता. यात काही आश्चर्य वाटण्यासारखे नव्हते. कारण आपणास इतिहासात असे दाखले व उदाहरणे सापडतात की, महत्त्वाकांक्षी लोक सत्तेच्या समीकरणात आपले मित्र व आप्तेष्टांवर देखील विश्वास ठेवत नाहीत व सत्तेत इतरांना सहभागी करून घेणे त्यांना क्वचितच पटते वा रुचते. शेवटी १९५८ साली त्याला सत्तापदांवरून हटविण्यात आले. बुल्गानिन हा ८ फेब्रुवारी १९५५ ते २७ मार्च १९५८ या काळात रशियन मंत्रीमंडळाचा अध्यक्ष म्हणजेच पंतप्रधान होता. १९६० साली बुल्गानिनवर सोव्हिएत संघातील राजकीय व इतर कुठल्याही बाबतीत सक्रिय सहभाग घेण्यावर बंदी टाकण्यात आली. अशातऱ्हेने त्याला राजकीय जीवनातून निवृत्त करून टाकून त्याला निवृत्तीवेतन देण्यात आले. बुल्गानिनचे २४ फेब्रुवारी १९७५ रोजी वयाच्या एकोणऐंशीव्या वर्षी मॉस्को येथे निधन झाले.

निकीता सर्गेयेविच ख्रुश्चेव (Nikita Sergeyevicu Khrushchev) याचा जन्म १५ एप्रिल १८९४ रोजी कुर्स्क (Kursk) ऑबलॉस्ट मधील कालिनोव्का (Kalinovka) या गावी झाला. ख्रुश्चेव हा १४ सप्टेंबर १९५३ ते १४ ऑक्टोबर १९६४ या कालावधीत सोव्हिएत संघाच्या साम्यवादी पक्षाचा 'प्रथम' सचिव होता. या अकरा वर्षांच्या काळात त्याचा रशियातील राजकारणावर वरचष्मा होता व खऱ्या अर्थाने त्याच्या हातात सोव्हिएत संघाची सत्तासूत्रे होती असे म्हणणे वावगे ठरू नये. स्टॅलिन हयात असताना ख्रुश्चेवचे त्याच्यासोबत चांगले संबंध होते, निदान वरकरणी तरी तसे वाटत असे. दुसऱ्या महायुद्धाला कलाटणी देणाऱ्या ठरणाऱ्या स्टॅलिनग्राडच्या लढाईदरम्यान ख्रुश्चेव स्टॅलिनग्राड शहरात जातीने हजर होता व याचा त्याला रास्त अभिमान होता. इतर अनेक बाबींसह स्टॅलिनने ख्रुश्चेवला युक्रेन प्रांताची राजकीय स्थिती हाताळण्याची जबाबदारी दिली होती. ख्रुश्चेवला स्टॅलिनचा नजीकचा सल्लागार मानले जात असे. ख्रुश्चेव व स्टॅलिन या दोघांमध्ये अशाप्रकारचे घनिष्ठ संबंध असले तरी ख्रुश्चेवने स्टॅलिनच्या मृत्युपश्चात त्याच्यावर जहरी टीका करण्यास सुरुवात केली. तसेच त्याने स्टॅलिनवर स्वत:च्या व्यक्तीपूजेवर बढावा दिल्याची व हुकूमशाही प्रवृत्ती जोपासल्याची टीका केली. आपल्या अकरा वर्षांच्या कालावधीत ख्रुश्चेवने स्टॅलिनच्या अनेक नीती व धोरणांना छेद देणारे निर्णय घेतले व स्टॅलिनची अनेक धोरणे व निर्णय रद्द करण्याचा सपाटा लावला. स्टॅलिनच्या धोरणांना विरोध करण्याच्या व बव्हतांशी स्टॅलिनच्या स्मृती रशियातून व एकंदरीतच रशियन जनतेच्या मनातून पुसून टाकण्याच्या ख्रुश्चेवच्या धोरणाला इंग्रजीत 'डि-स्टॅलिनायझेशन' (de-Stalinization) असे संबोधले गेले. ख्रुश्चेवने रशियन लेखकांना काही प्रमाणात व काही काळापुरते का होईना परंतु अभिव्यक्ती स्वातंत्र्य बहाल केले. त्याने 'शांतीपूर्ण सहजीवन'-Peaceful Co-existence हा नारा देऊन अमेरिका व तिच्या गटातील इतर पाश्चिमात्य राष्ट्रांसोबतचा तणाव कमी करून खऱ्या अर्थाने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचा

प्रयत्न केला. ख्रुश्चेवच्या कारकीर्दीत परराष्ट्र धोरणाबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक वादग्रस्त घटना घडल्या. अशीच एक वादंग माजवणारी घटना म्हणजे १६ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर १९६२ या कालावधीत घडलेली क्यूबाची तेढ वा क्यूबन क्षेपणास्त्र समस्या (तंटा) होय. या समस्येमागचे वा तंट्यामागचे कारण असे होते की, ख्रुश्चेवने रशियन बनावटीची क्षेपणास्त्रे अमेरिकेच्या अगदी नजीक असलेल्या क्यूबा या देशात स्थापित करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे रशियन जहाजे अटलांटिक महासागरमार्गे ही क्षेपणास्त्रे क्यूबा या देशात घेऊन चालली होती. याची खबर अमेरिकेला लागली. क्यूबात स्थापित होणाऱ्या या रशियन क्षेपणास्त्रांमुळे अमेरिकेचा बराचसा भाग व शहरे या क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात येणार होती. त्यामुळे अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन एफ्. केनेडी हे पुरते चिडले व त्यांनी अमेरिकेच्या नौदलाला रशियाची क्यूबात क्षेपणास्त्रे घेऊन येणारी जहाजे अटलांटिक महासागरातच रोखण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे अमेरिकन नौदलाच्या जहाजांनी भर समुद्रात सोव्हिएत संघाच्या जहाजांची नाकेबंदी केली. एवढेच नव्हे तर अमेरिकेच्या भूमिकेपुढे रशिया व ख्रुश्चेवला नमते घ्यावे लागले व क्यूबातून आपली स्थापित केलेली क्षेपणास्त्रे काढून घ्यावी लागली. अमेरिकेने देखील रशियाच्या या भूमिकेच्या बदल्यात त्यांनी तुर्कस्तानात स्थापित केलेली अमेरिकन बनावटीची ज्यूपीटर क्षेपणास्त्रे काढून घेण्याचे व क्यूबावर भविष्यात हल्ला न करण्याचे आश्वासन दिले. या संपूर्ण क्यूबन मिसाईल क्रायसिसच्या (Cuban Missile Crisis) वा क्यूबन क्षेपणास्त्र समस्येच्या काळात अवघे जग प्रचंड दडपणाखाली होते. यावेळी या दोन महासत्तांमध्ये युद्धाची ठिणगी पडून तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात होते की काय व या दोन महासत्ता एकमेकांविरोधात अण्वस्त्रांचा वापर करतील की काय अशी भीती सगळ्या जगाला वाटत होती. परंतु शेवटी ख्रुश्चेव व केनेडी या दोघांनीही सद्सद्विवेक बुद्धीचा वापर केला व जगाला एका मोठ्या युद्धापासून नव्हे तर संकटापासून वाचवले असे म्हणावे लागेल.

स्टॅलिनच्या पश्चात ख्रुश्चेवच्या काळात सोव्हिएत संघ व चीन या दोन साम्यवादी देशांमधील संबंध बिघडत गेल्याचे निदर्शनास येते. यासाठी साम्यवादी चीनचा तत्कालीन सर्वेसर्वा माओ-झे-दंग हा कारणीभूत होता असे म्हणणे वावगे ठरू नये. स्टॅलिनच्या मृत्युनंतर वेळोवेळी माओने सोव्हिएत संघाला अडचणीत आणणारी भूमिका घेतलेली व टीका केलेली आपल्या निदर्शनास येते. ही बाब सोव्हिएत संघातील नेत्यांना व विशेषतः ख्रुश्चेवला रुचली नाही.

ख्रुश्चेवला भारताविषयी सहानुभूती होती असे म्हणणे सयुक्तिक ठरेल. १९५९ साली जेव्हा साम्यवादी चीनने भारताविरुद्ध कुरापती काढत आंतरराष्ट्रीय सीमेवर वाद निर्माण केला तेव्हा ख्रुश्चेवने चिनी साम्यवादी नेता माओ-झे-दंगला चीनची बाजू कशी चुकीची आहे हे स्पष्टपणे सुनावले होते व भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांची पाठराखण केली होती. १९६२ साली जेव्हा चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हादेखील रशियाने भारताला प्रगत स्वरूपाची 'मिग' लढाऊ विकून मदत केली होती. तसेच ख्रुश्चेवच्या काळात सोव्हिएत संघाचे भारताला संरक्षण व आर्थिक बाबतीतील मदतीचे प्रमाण निश्चितच वाढत होते.

औद्योगिक विकासाच्या बाबतीत ख्रुश्चेवने प्रामुख्याने हलक्या व गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना बढावा दिला. या मागची भूमिका रशियातील जनतेला या विविध वस्तू मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून द्याव्यात व त्यांचे राहणीमान उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत अशी होती. या बाबतीत रशियातील साम्यवादी सरकारला मोठ्या प्रमाणात यश आले यात वाद नाही.

---

जिंकण्याची मजा तेव्हाच येते जेव्हा सर्वजण तुमच्या हरण्याची वाट पाहत असतात!

ख्रुश्चेवने औद्योगिक उत्पादनात वाढ व्हावी यासाठी कामगारांना वेतनवृद्धी देण्याचे धोरण अवलंबिले.

रशियातील कृषी उत्पादनात वाढ करणे हा स्टॅलिनच्या काळापासूनच मोठा यक्ष प्रश्न होता. त्यामुळे ख्रुश्चेवने त्याच्या हातात सत्तासूत्रे आल्यानंतर 'व्हर्जीन लँड्स् स्किम' (the Virgin Lands Schemes) ही नावीन्यपूर्ण योजना राबविली. या योजनेअंतर्गत रशियातील सैबेरिया व कझाकस्तान या दोन मोठ्या प्रांतातील आतापर्यंत शेतीसाठी न वापरल्या गेलेल्या जमीनी ताब्यात घेऊन त्यांची मशागत करून त्यावर पिकांची लागवड करण्यात आली. या धोरणामुळे काही काळ थोड्याबहुत प्रमाणात अन्नधान्यांचे उत्पादन वाढले. परंतु सोव्हिएत संघ (रशिया) अन्नधान्यांच्या बाबतीतील स्वयंभू होऊ शकला नाही व अनेकदा या देशाला त्याचे स्पर्धक असलेल्या अमेरिका व ऑस्ट्रेलिया अशा पाश्चिमात्य देशांकडून अन्नधान्याची आयात करावी लागे.

ख्रुश्चेवचे व्यक्तिमत्त्व शीघ्रकोपी होते. तो आपल्या विरोधकांवर अनेकदा रागवत असे व त्यांच्यावर कडक शब्दांत टीका करत असे. याचे ठळक उदाहरण म्हणजे, त्याने एकदा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बैठकीत रागाने आपल्या पायातील बूट (जोडा) काढून तो टेबलावर जोरजोरात आपटला होता!

१४ ऑक्टोबर १९६४ रोजी ख्रुश्चेवला रशियन साम्यवादी पक्षाच्या प्रेसिडिअमने व केंद्रीय समितीने सर्व पदांवरून हटवले. हा सगळा प्रकार अशा रीतीने घडवून आणला गेला की, ख्रुश्चेवने स्वेच्छेने राजकीय निवृत्ती मंजूर करण्याची विनंती पक्षाकडे करावी व पक्षाने ती मान्य करावी. ख्रुश्चेवला कळून चुकले की, त्याला पदच्युत करण्याची तयारी अगोदरच झालेली आहे व त्याला विरोध करून काही उपयोग होणार नाही. प्रेसिडिअम व केंद्रीय समितीने ख्रुश्चेवचा राजीनामा स्वीकारला व सोव्हिएत संघातील ख्रुश्चेव युगाचा शेवट झाला. ज्या व्यक्तीने ख्रुश्चेवला सत्तापदावरून हटविण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली त्याचे नाव लिओनिड ब्रेझनेव (Leonid Brezhnev) असे होते. ख्रुश्चेवला पदच्युत केल्यानंतर ब्रेझनेवची रशियन साम्यवादी पक्षाचा 'प्रथम' सचिव, तर अलेक्झी निकोलायेविच कोसिजीन (Alexei Nikolayevich Kosygin) याची रशियाचा म्हणजेच सोव्हिएत संघाच्या मंत्रीमंडळाचा अध्यक्ष म्हणजेच पंतप्रधान म्हणून निवड झाली.

ख्रुश्चेवला अशाप्रकारे सक्रिय राजकारणातून निवृत्त व्हायला लावून त्याला महिना पाचशे रूबल्स (Rubles–रूबल्स हे रशियाचे चलन होय) एवढे निवृत्तीवेतन देण्यात आले. त्याची राहण्याची म्हणजेच निवासस्थानाची व्यवस्था देखील करण्यात आली. काही काळानंतर त्याच्या निवृत्तीवेतनात कपात करून ते पाचशे रूबल्स वरून चारशे रूबल्सवर आणण्यात आले. ख्रुश्चेवकडे त्याच्या निवृत्तीनंतर मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करण्यात आले. याचा या वयाच्या सत्तरीतल्या व्यक्तीला खूप त्रास झाला. त्यामुळे त्याला मानसिक नैराश्यदेखील येऊ लागले. ख्रुश्चेवने आपल्या आठवणी ध्वनीमुद्रीत करण्यास सुरुवात केली. परंतु रशियाच्या 'केजीबी' (KGB) या गुप्तचर संघटनेने त्या ध्वनीमुद्रीत फीती ताब्यात घेतल्या. मात्र, ख्रुश्चेवच्या या ध्वनीफीती रशियातून बाहेर पडल्याच व पाश्चिमात्य देशांमध्ये ख्रुश्चेवच्या आठवणी छापून आल्या व तत्कालीन सोव्हिएत संघातील राजकीय वातावरण व परंपरेप्रमाणे ख्रुश्चेवच्या ध्वनीफीती व त्यावर आधारित आठवणी सत्य नसल्याचे जाहीर करण्यात आले. ख्रुश्चेवचे ११ सप्टेंबर १९७१ रोजी मॉस्को मध्ये वयाच्या सत्याहत्तराव्या वर्षी निधन झाले. त्याच्या मृतदेहाला राजकीय इतमामात दफनविधी करण्याची परवानगी नाकारण्यात आली. ख्रुश्चेवने भारत–चीन सीमाप्रश्नाच्या वादात भारताला पाठिंबा दिल्याने भारतीय लोकांसाठी ख्रुश्चेव हा भारताचा

(पृष्ठ क्र.२५ वर)

# आंबा व संस्कृत साहित्य

*एप्रिल व मे महिना म्हणजे आंब्याचा मोसम. आंब्याच्या संबंधाने संस्कृत साहित्यात आलेल्या संदर्भावर प्रकाश टाकणारा डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांचा लेख - संपादक*

आंबा हे भारताचे राष्ट्रीय फळ आहे. उन्हाळ्यामध्ये घरोघरी विशेष करून हापूस आंब्याचा रस मनसोक्तपणे खाण्याचा प्रघात महाराष्ट्रात अनेक पिढ्यांपासून सुरू आहे. अन्य फळांपेक्षा आंब्याला सर्वांचीच पसंती अधिक असते. वसंतऋतुची चाहूल लागली की आंब्याच्या झाडाला मोहर येतो. दुर्गा भागवतांनी आपल्या 'ऋतुचक्र' या पुस्तकात 'सहा ऋतुंचे सहा सोहळे' अगदी अनोखेपणाने चितारले आहेत. संत ज्ञानेश्वरांच्या 'वसंतऋतु'चे रूपक योजून दुर्गाबाई वसंताला 'ऋतुपती' असं संबोधतात.

**का ऋतुपतीचे द्वार। वनश्रीनिरंतर।**
**वोळगे फळभार। लावण्येसी।।**

वसंतऋतुला ऋतुपतीचे द्वार संबोधून निरंतर वनश्री व फळभाराच्या लावण्याने बहरलेला ऋतु म्हणजे वसंत. वसंतागमना नंतर आंबा बहरतो.

संस्कृत वाङ्मयात मोठं नाव असलेला पण्डितराज जगन्नाथ आपल्या 'भामिनीविलास' या ग्रंथात कोकिळला उद्देशून एक अभिनव श्लोक लिहितो.

तावत्कोकिल विरसान् यापय दिवसान् वनान्तरे निवसन्।
यावन्मिलदलिमालः कोऽपि रसालः समुल्लसति।।

कवी म्हणतो की, हे कोकिळ, तोपर्यंत हे विरस दिवस कसे तरी व्यतीत कर. तोपर्यंत वसंतऋतुच्या आगमनानंतर आंब्याच्या झाडाला मोहर येईल व तुला कुजन करता येईल.

**'कुसुमजन्म ततो नवपल्लवास्तदनुषट्षदकोकिलकूजितं।'**

भारतीय साहित्यात कोकिळ नेहमी आंब्याच्या झाडावर दाखवला जातो. कोकिळचा पंचमालाप स्वर हा अनेक वेळा विरहिणी स्त्रियांना आपल्या प्रियतमाची आठवण करून देतो. आंब्याच्या सुगंधाने विरहातूर प्रेमी मूर्च्छित पडत असत असा उल्लेख कालिदास आपल्या ऋतुसंहाराच्या सहाव्या सर्गात करतो. आंब्याचा मोहर, आम्रपल्लव व आंब्याचे फळ हे कामशास्त्रात देखील अत्यंत महत्त्वाचे आहेत. कामदेवाच्या पाच बाणांपैकी एक बाण हा 'आम्रमंजिरी' म्हणून कल्पिलेला आहे.

वसंतऋतुला 'मधु-ऋतु' असेही म्हटले आहे. मधु अर्थात अनेक फुलपाखरांनी आपल्या मुखातून जमा केलेला मध. मधु म्हणजे मधु वृक्ष (आंबा). मधु म्हणजे ज्याचा परिपाक मधुर होय असं फळ. प्राचीन किंवदतीमध्ये असेही म्हटले आहे की, जिथे मधुक वृक्ष अर्थात आंब्याचे झाड उगवत नसेल अशा प्रदेशात निवास करू नये.

हाल या प्रख्यात कविच्या 'गाथा सप्तशती' या प्रख्यात ग्रंथात आंब्याच्या झाडाचा, आम्रमंजिरीचा व आमराईचा खूप सुंदर व शृंगारिक भाव प्रतीत होतो.

एका गाथेत हाल म्हणतो -

**बहु पुप्फभरो नामिअभूमिग, असाह सुअणु विष्णत्तिम्।**
**गोला तइ विअइ कुडंग महुअस्त्रणिय गलिज्जासु।।**

अर्थात एक प्रेमी आमराईत येतो व आंब्याच्या मोहराकडे पाहून म्हणतो की, 'हे आम्रवृक्षा, तुझ्या आम्रमंजिरीच्या भारामुळे तुझ्या फांद्या किती खाली

स्वत:ला जिंकायचे असेल तर डोक्याचा उपयोग करा; इतरांना जिंकायचे असेल तर हृदयाचा उपयोग करा!

वाकल्या आहेत. तू हळूहळू तुझ्या आम्रमंजिरी खाली पडू दे व जेणेकरून हा वसंतऋतुचा काळ वाढेल व मला माझ्या प्रेयसीशी थोडा अधिक वेळ प्रणयाराधन करावयास मिळेल.

हे झालं आंब्याच्या झाडाचं बाह्यवर्णन. आपल्या लोक कल्पनेत आंबा हा मांगल्याचे प्रतीक आहे. स्वप्नात जर आंब्याचे झाड वा आम्रमंजिरी पाहिली तर पुत्रोत्पत्तीचा फलादेश शास्त्रांनी सांगितला आहे. घरात मंगलप्रसंगी आंब्याच्या झाडाची पाने 'आम्रपल्लव' म्हणून कलशावर ठेवतात. आंब्याच्या झाडाची पानं एका माळेत बांधून तोरण तयार केलं जातं.

संस्कृत साहित्यात 'बाणभट्ट' या महान कवीचे स्थान मोठे आहे. त्याची 'कादंबरी' ही अजोड कृती. संस्कृत गद्याच्या अप्रतिम पदललित्याचा कादंबरी हा एक वस्तुपाठ. कादंबरी मुळेच तर भारतीय भाषांमध्ये गद्याची रचना केलेल्या 'Novel' या शब्दाला प्रतिशब्द 'कादंबरी' दिला जातो. या बाणभट्टांनी कालिदासाची प्रतिभा वर्णन करताना आम्रमंजिरीचे रुपक वापरले आहे. बाणभट्टाचे हे रुपक म्हणजे कालिदासाच्या नवनवोन्मेष शालिनी प्रतिभाशक्तीचे यथार्थ वर्णन होय. आपल्या 'हर्षचरितम्' या ग्रंथाच्या प्रथम उच्छ्वासात बाणभट्ट म्हणतो.

**निर्गतासु न वा कस्य कालिदासस्य सूक्तिषु।**
**प्रीतिर्मधुर सान्द्रासु मंजरीषु इव जायते।।**

(हर्षचरित, प्रथम उच्छ्वास, श्लोक १६)

अर्थात कालिदासाच्या लेखणीतून निघालेल्या काव्यावर कोणाची प्रीती होणार नाही बरे! कारण त्यात आम्रमंजिरीची 'मधुरता' व 'सान्द्रता' हे दोन गुण बेमालूमपणे मिसळले आहेत.

बाणभट्टांच्या 'कादंबरीचे' अवलोकन केल्यास विशेषतः 'महाश्वेतावृत्तांत' या प्रकरणाचे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, बाणभट्टांनी निसर्गाचे अप्रतिम वर्णन केले आहे. हे वर्णन मुळातून वाचले पाहिजे असे आहे. बाणभट्टांनी आम्रमंजरीला 'मधुर' असे का म्हटले असेल याचा ऊहापोह त्रिलोचननाथ तिवारी या विद्वानाने 'प्रीतिः मंजरीषु इव' या लेखात 'मघा' नावाच्या आपल्या ब्लॉगवर केला आहे. त्यांच्या मते ज्यांनी आम्रमंजिरीचे प्राशन केले आहे त्यांना समजेल की, त्याचा स्वाद 'कषाय' अर्थात 'तुरट' असतो. प्रेयसीच्या अधरोष्ठाचे प्रगाढ चुंबन व आम्रमंजिरी या दोन्हीचीही चव जिभेला कषाय स्वाद देते. तरीपण आपल्या साहित्यात याला मधुर म्हटलं आहे. वरील सुक्तीत कालिदासाच्या प्रतिभेला आम्रमंजिरीची उपमा देऊन 'मधुर' शब्द प्रयुक्त केला याचा अर्थ मोठा गहन आहे.

'मधुर' व 'सान्द्र' हे दोन गुण आम्रमंजिरीच्या व कालिदासाच्या प्रतिभेच्या संबंधाने बाणभट्ट वापरतात. सान्द्र म्हणजे निबीड, गुच्छासारखं. आंब्याचा मोहर हा एक फूल नसून फुलांच्या अनेक गुच्छांचा समुच्चय असतो. यावरून सांद्रतेचा भाव समजतो. पण आम्रमंजिरी तुरट असून तिला 'मधुर' असं का म्हटलं असावं या प्रश्नाचे उत्तर मोठे विचार करण्यासारखे आहे. प्रियेचे प्रगाढ चुंबन व आम्रमंजरी याचा स्वाद जरी कषाय असला तरी त्याचा परिपाक हा 'मधुर' असतो. म्हणून बाणभट्टांनी कालिदासाच्या प्रतिभेला अनुलक्षून 'मधुर' शब्द वापरला. हा स्वाद जीभेने घ्यावयाचा नसून आत्म्याच्या द्वाराने घ्यावा लागतो. ज्ञानेश्वरांनी म्हटलंय -

**ते बोल मनाच्या कानी ऐकावे। बुद्धीच्या डोळा देखावे।**
**साटोवाटी घ्यावे। चित्ताचिया।**
**अवधानाचेनी हाते। तेयावे हृदयापरौते।**
**मग ते पुरवतील अयनीते। सज्जनांचिया।।**

**- डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

तुम्ही ठरवलेल्या ध्येयावर लोक हसत नसतील तर तुमची ध्येये खूपच लहान आहेत हे लक्षात घ्या.

# पेव / पुष्करमूळ

*'पेव / पुष्करमूळ' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, बऱ्याच जुन्या उंच इमारतींच्या दर्शनी भागाच्या मागे किंवा बाजूला एक गोलाकार जिना असल्याचे आपण पाहिले असणारच. इमारतीमध्ये लिफ्ट असूनही बाजूला पायऱ्या असणे गरजेचे आहे. संकट समयी याच पायऱ्यांचा आधार घेणे महत्त्वाचे असते. पण इमारतीच्या बाहेर जिना असण्याची गरज काय? तर आगीसारख्या संकटाच्या वेळी इमारतीमध्ये धूर पसरल्यास आतील जिन्यांवरून बाहेर पडणे शक्य होत नाही. त्यामुळे बाहेरच्या बाजूला जिना ठेवण्याची पूर्वी पद्धत होती. या गोलाकार जिन्याचे निरीक्षण करतांना एक गोष्ट लक्षात येते की, ही रचना निसर्गाने खूप पूर्वीच वापरली आहे; किंवा मानवाने निसर्गाकडूनच ही रचना घेतली असावी. ही रचना आहे जंगलात आढळणाऱ्या पेव किंवा पुष्करमूळ या वनस्पतीची. जमीनीशी मजबूत असणारे भक्कम खोड जसजसे वर वाढत जाते तसे ते सरळ उंच न वाढता चक्राकार वळणे घेत वरवर जाते. जशी एकाद्या यंत्रामधील वेटोळेदार स्प्रींग. या खोडाच्या केवळ बाह्य बाजूला असणारी लंबगोलाकार पाने जमिनीशी तथा एकमेकांशी समांतर असलेली. एखाद्या लहान प्राण्याला किंवा किड्यांना वर शेंड्यापर्यंत जाण्यासाठी या पानांचा पायऱ्या म्हणून नक्कीच उपयोग करता येईल. या झाडाला बोलीभाषेत 'पेव' असे संबोधण्यात येते.



ही झुडूप वर्गीय वनस्पती १ ते २ मीटर उंच वाढणारी व आयुष्य जेमतेम वर्षभराचे. पावसाचे आगमन झाले की ओलाव्याचा फायदा घेत एक एक पायरी करीत वळसे घेत वर वर जाणारी. या झाडाची पाने १५ ते ३० सें. मी. लांब व ५ ते ७.५ सें. मी. रुंद व आयताकृती आकार असलेले शेंडे मात्र निमूळते अन् टोकेरी. हिरव्या गर्द रंगाच्या या पानावर मऊ रेशमी लव असते. लालसर रंगाच्या खोडावर चक्राकार असलेली हिरव्या पानांची रचना फारच विलोभनीय दिसते. ऑगस्ट ते ऑक्टोबरमध्ये झाडाच्या टोकाशी लालगर्द रंगाच्या कणीसामधून डोकावणाऱ्या पांढऱ्या टोकेरी कळ्यांमधून, पांढऱ्या रंगाची ग्रामोफोनच्या भोंग्यासारखी दिसणारी फुले उमलतात. या फुलांची लांबी ७ ते ८ सें. मी. व भोंग्याच्या तोंडाशी असलेल्या कडा मात्र झालरयुक्त व खालच्या बाजूला झुकलेल्या. मधोमध पिवळा रंग. जेव्हा ही फुले फुलतात तेव्हा जंगलात सर्वत्र पांढऱ्या रंगाचे वर्चस्व असते. कदाचित यावरूनच पेव फुटणे असा वाक्प्रचार प्रचारात आला असावा. यालाच 'कुष्ट' असेही नाव आहे. याचे शास्त्रीय नाव आहे Costus specious (Costus Speciosus) पिंगा किंवा पुष्करमूळ अशीही याची नावे आहेत.

या झाडाची पुनरोत्पत्ती याच्या त्रिदली लाल रंगाच्या

---

जोपर्यंत चांगले शिक्षण घेणे म्हणजे चांगली नोकरी लागणे ही संकल्पना पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यातून निघत नाही, तोपर्यंत समाजात नोकरच जन्माला येतील; मालक नाही!

बोंडापासून मिळणाऱ्या काळ्या रंगाच्या बारीक बियांपासून, तसेच जमिनीच्या आत सरपटत पुढे जाणाऱ्या मुळांना फुटणाऱ्या कोंबांपासून होते. ही वनस्पती कोकणात सर्वत्र दिसते. मुंबई जवळील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ही विपुल प्रमाणात आढळते. भारताशिवाय चीन, मलाया, श्रीलंका या देशातही ही वनस्पती आढळते. हिच्यात बरेच औषधी गुण आहेत. ती श्वासनलिकेचा दाह, पांडूरोग, संधिवात, कटीशूल, वात, कप, ज्वर व उचकी यावर वापर करतात. या वनस्पतीच्या मुळापासून शक्तीवर्धक कल्प तयार करतात. अर्थात कोणत्याही वनस्पतीचा औषध म्हणून उपयोग करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य.

ही वनस्पती सह्याद्रीच्या परिसरात ओलसर व दमट वातावरणात वाढत असल्याचे जास्त प्रमाणात दिसते. पानझडीच्या व शुष्क प्रदेशात ती क्वचितच दिसते. ती शोभेचे झाड म्हणून मुद्दाम कुणी लावत नाही. मात्र औषधी वनस्पती म्हणून काही भागात हिची लागवड करण्यात येते. आपल्याकडे ठिकठिकाणी दिसून येणारी कमी पैशात व कमी श्रमात जास्त नफा मिळविण्याची कृतीही सर्व औषधी वनस्पतींच्या मुळावर उठली आहे. स्वतः औषधी वनस्पतीची लागवड करण्यात पैसा गुंतविण्यापेक्षा, औषधाचे व्यापारी हे जंगल परिसरातील लोकांना हाताशी धरून, जंगलात आयती मिळणारी वनस्पती ओरबाडून आणतात व त्याद्वारे नफा कमवितात. त्यामुळे बऱ्याच वनस्पती जंगलातून नष्ट होताना दिसत आहे.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून - **चार्ल्स डार्विन**)

चार्ल्स डार्विनचे जीवन विद्यार्थ्यांना फारच प्रेरणादायी आहे असे मला वाटते. निसर्ग निरीक्षण हा त्यांचा छंद. तो त्याने जन्मभर जोपासला. बिगल जहाजावर एक सहाय्यक म्हणून जाशील का? अशी विचारणा करण्यात आली तेव्हा मागचा पुढचा विचार न करता त्याने ती जबाबदारी स्वीकारली. मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा करून घेतला. एव्हढेच नव्हे, आपले क्रांतीकारी मत हिमतीने जगापुढे मांडले. त्यांच्या या यशात त्यांचे वडील, त्यांचे सासरे आणि त्यांची पत्नी यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आपल्या मुलाला वैद्यकीय शिक्षणात रस नाही हे समजल्यावर त्याच्या वडिलांनी त्याला शिक्षणाची दिशा बदलून दिली. बिगल जहाजावर जाण्याची इच्छा व्यक्त केल्यावर त्यासाठी लागणारी आर्थिक मदत त्यांनी केली. त्यांच्या सासऱ्याने त्याला विचार आणि प्रयोग करायला वेळ मिळावा म्हणून सर्व सुविधा मिळवून दिल्या. त्यांच्या पत्नीने त्याच्या दहा मुलांचा सांभाळ केला, त्याचबरोबर त्याचाही सांभाळ केला. विज्ञानाच्या प्रगतीला आप्तजणांचे आणि समाजाचे सहकार्य आवश्यक आहे हेच यातून प्रतीत होते.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे – ४२१२०४

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# विचारांती असे ठरते की ....

*सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि नोकरशहा मा. मोण्टेकसिंग अहलुवालिया यांचे "Backstage : The story behind India's High growth years" या पुस्तकाचे परीक्षण चंद्रशेखर टिळक यांनी केले आहे – संपादक*

सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि नोकरशहा माननीय मोण्टेकसिंग अहलुवालिया यांचे Backstage : The story behind India's High growth years हे पुस्तक वाचायला सुरवात केली आणि पदोपदी, अगदी पानोपानी प्रख्यात मराठी नाटककार कै. प्रा. वसंत कानेटकर यांच्या गाजलेल्या 'विषवृक्षाची छाया' या नाटकाची आठवण यायला लागली. या नाटकाच्या नावासाठी नाही; किंवा मोण्टेकसिंग अहलुवालिया यांची तुलना राजवाड्यांशी करण्याचा तर प्रश्नच येत नाही; तर ते नाटक प्रसिद्ध इतिहासकार वि. का. राजवाडे यांच्या जीवनावर आधारित आहे म्हणून! जुनी ऐतिहासिक कागदपत्रे व बखरी यांतून इतिहासाच्या वास्तवाचा धांडोळा जसा राजवाड्यांनी त्यांच्या आयुष्यभर घेतला तसं हे पुस्तक आपल्या स्वातंत्र्योत्तर अर्थकारणाचा मागोवा घेते हे एक कारण!

दुसरे कारण म्हणजे त्या नाटकाचा नायक चिंतो बापूजी (चित्तरंजन कोल्हटकर) यांच्या तोंडी त्या नाटकात वारंवार एक उल्लेख येतो ...विचारांती असं ठरतं की ....

हे पुस्तक वाचत असताना सारखे वाटत होते की, त्या नाटकात 'विचारांती असं ठरतं की' हे त्या एकट्याच्या विचारांवर अवलंबून आहे, तरी ते सातत्यपूर्ण आणि बौद्धिक निष्ठेचे फळ आहे; तर राष्ट्रीय आर्थिक धोरण हे सामूहिक विचारातून विचारार्थ येते आणि वैयक्तिक निर्णयातून कार्यान्वित होते ...

अशा अर्थाने 'विचारांती असे ठरते की ! ! ! !'

सततच्या ऑफीस टूर्समुळे हे पुस्तक वेगवेगळ्या विमानतळांवरच्या पुस्तकांच्या दुकानातून सतत खुणावत होते. मोहात पाडत होते. पण अलीकडेच सुब्रमण्यम स्वामी यांच्या बहुचर्चित Reset : Regaining India' s Economic Legacy या पुस्तकाने केलेल्या संपूर्ण भ्रमनिरासामुळे मन धजावत नव्हते. दुसरीकडे सुब्रमण्यम स्वामी आणि मोण्टेकसिंग अहलुवालिया हे दोघेही जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ असले, तरी बाकी त्यांच्यात काहीही साम्य नाही असं दुसरे मन सांगत होते. पण एकदा लहानपणापासूनच्या वाचनाच्या व्यसनाने मात केली आणि हे पुस्तक विकत घेतलेच. त्या खरेदीत निर्णायक भूमिका बजावली ती या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर असलेल्या १६ घटनांच्या यादीने आणि त्याच्या सर्वसमावेशकतेने !

अशाही अर्थाने विचारांती असे ठरते की ! ! !

या पुस्तकाच्या मनोगताच्या पहिल्याच ओळीत मोण्टेकसिंग अहलुवालिया सांगतात की, हे पुस्तक म्हणजे त्यांचे Memoir (चरित्र अशा अर्थाने ) नाही. त्याच्या पुढच्याच वाक्यात ते Memoir म्हणजे Selfies in Book form अशी खिल्लीही उडवतात. पुस्तक गंभीर विषयाकडे मिश्किलपणे पाहाणार याची ती नांदी ठरते. हे संपूर्ण पुस्तक म्हणजे पडदा उघडल्यापासून पडदा पडेपर्यंत एक अभ्यासू, विद्वत्तापूर्ण असलेले आणि तरीही जरासुद्धा बोजड नसलेले प्रभावी आणि प्रगल्भ नाटक ठरते. हे पुस्तक वाचताना एकसारखे माझ्या मनात हेच येत होते की, Memoir या शब्दाचा एक अर्थ जसा 'चरित्र' असा आहे; तसाच आणि तितकाच शब्दकोशानुसार

---

स्वप्ने पाहातच असाल तर मोठीच पाहा. लहान कशाला? कारण मोठी स्वप्नेच माणसाचं रक्त ढवळू शकतात!

Memoir या शब्दाला 'स्वतःच्या अनुभवांचा इतिहास' आणि 'एखाद्या विशिष्ट विषयांसंबंधीचा संशोधनात्मक निबंध', असेही अर्थ आहेतच की !

या सर्वच अर्थांना जागणारे असे हे पुस्तक आहे.

अशाही अर्थाने ...'विचारांती असे ठरते की !!!'

सर्वसाधारणपणे कोणतेही पुस्तक आवडले की आपण ते पुस्तक 'एका झटक्यात वाचून झाले' असे म्हणतो. मला हे पुस्तक आवडले. खूप आवडले. मी ते वारंवार चाळत राहीन हे नक्की.

पण तरीही हे पुस्तक मी 'एका झटक्यात वाचले' असे म्हणणार नाही. म्हणू शकणार नाही.

कारण मी ते तसे वाचले नाही.

वाचू शकलो नाही.

या पुस्तकाच्या वेगवेगळ्या प्रकरणांचे वाचन होत असताना मला वेगवेगळी पुस्तके आठवत होती ....कधी त्यांच्यातली साम्यस्थळे आठवत होती म्हणून, तर कधी त्यातला विरोधाभास जाणवत होता म्हणून ...

सांगून खोटे वाटेल कदाचित ...

पण हे पुस्तक वाचत असताना एकावेळी हे पुस्तक धरून मी एकूण ६ पुस्तके वाचत होतो ....

सुब्रमण्यम स्वामी यांचे आधी उल्लेख केलेले Reset ....., ज्येष्ठ सनदी अधिकारी जमिनी भगवती यांचे The Promise of India : How Prime Ministers Nehru to Modi shaped The Nation 1947-2019 हे पुस्तक.

माजी केंद्रीय अर्थमंत्री कै. मा. अरुण जेटली यांचे - New India : Selected Writtings 2014-2019, हे पुस्तक. संजय बारू यांचे The Accidental Prime Minister : The Making and Unmaking of Manmohan Singh हे पुस्तक, आणि पूजा मेहरा यांचे The Lost Decade 2008-2018: How India's Growth Story Developed into Growth without a story ही ती पुस्तके .... त्यामुळे या प्रक्रियेत कव्हर टू कव्हर असे हे ४३४ पानी पुस्तक वाचायला मला एक आठवडा लागला. कारण ही ६ पुस्तके मिळून २५०० पानी मजकूर वाचला गेला की ! ! ! !

अशाही अर्थाने 'विचारांती असे ठरते की ! ! !'

असं वाचत असताना लक्षात यायला लागले की, एकाच कालखंडाकडे प्रशिक्षित सनदी नोकरशहा (जमिनी भगवती), रुढार्थाने सनदी नसणारे पण अनुभवी धोरणकर्ते (मोण्टेकसिंग अहलुवालिया), अनुभवी राजकारणी (अरुण जेटली), पत्रकार (संजय बारू आणि पूजा मेहरा) बघताना त्यात किती साम्य आणि फरक असतो ते ! ! !

मग लक्षात येते की, स्वामी जितके प्रभावी बोलतात तेवढे ते सांभाळून लिहितात.

पत्रकार सनसनाटी आणि एकांगी शीर्षक देतात आणि त्याला अनुसरून लिहितात.

निवृत्त सरकारी अधिकारी घटना तपशीलात देतात आणि निष्कर्ष तुमच्या - आमच्यावर सोडतात ....

निदान तसं दाखवतात ....

आणि तरीही काही साम्य उरतात ....

आता हेच बघा ना ....

भगवती आणि अहलुवालिया दोघेही माननीय कै. चन्द्रशेखर यांच्या कालखंडाचे वर्णन INTERLUDE अशा शब्दांत करतात.

INTERLUDE या शब्दाचे डिक्शनरी नुसार तीन अर्थ आहेत ... 'मध्यंतर', 'नाटकाच्या दोन अंकांदरम्यानचा

---

काळ', 'दोन अंकांच्या दरम्यान सादर केलेला (करमणुकीचा) कार्यक्रम' असे ते तीन अर्थ आहेत.

चन्द्रशेखर सरकार केवळ ७ महिने(च) सत्तारूढ होते म्हणून त्याला 'मध्यंतर' म्हणायचे, तर चरणसिंग चौधरी यांचे सरकार तर फक्त ५ महिने आणि एच. डी. देवेगौडा व इंदरकुमार गुजराल यांची सरकारे प्रत्येकी १० महिने आणि विश्वनाथ प्रतापसिंग सरकार जेमतेम ११ महिने सत्तेत होती. हा काळ जवळपास एकसारखाच असताना एका सरकारला मध्यंतर म्हटले जाते आणि इतरांना नाही यांत वाचकांनी काय ते समजून जायचे असते! गंमत म्हणजे याच चन्द्रशेखर सरकारमधे अर्थमंत्री असणाऱ्या यशवंत सिन्हा यांचे मात्र या पुस्तकात कौतुक केले आहे ....

असं READING BETWEEN THE LINES असंही या पुस्तकात बरंच काही आहे ...

आता यातले असं यथाशक्ती – यथामती टिपायचं तर वेळ लागणारच ना !

.... एक वेगळाच अनुभव आणि आनंद.

....... असा अनुभव देणारे पुस्तक अशा अर्थाने ..... 'विचारांती असे ठरते की ! ! ! !'

मोण्टेक सिंग अहलुवालिया यांचे हे पुस्तक वाचताना अनेकदा जाणवते की, त्यांना केवळ एक नोकरशहा म्हणून नव्हे तर एक व्यक्ती म्हणूनही राजीव गांधी, विश्वनाथ प्रताप सिंग आणि डॉ. मनमोहन सिंग या तीन व्यक्तींबद्दल एक 'सॉफ्ट कॉर्नर' आहे. या तिन्ही व्यक्ती आपल्या देशाच्या पंतप्रधानही होत्या आणि अर्थमंत्रीही होत्या .....असलाच तर फरक इतकाच की राजीव गांधी आधी पंतप्रधान झाले आणि मग त्याच काळात त्यांच्याकडे तात्पुरता अर्थ खात्याचा कारभार होता; तर विश्वनाथ प्रतापसिंग आणि डॉ. मनमोहन सिंग हे आधी पूर्णवेळ अर्थमंत्री झाले आणि मग पंतप्रधान. (शिवाय विश्वनाथ प्रतापसिंग आणि डॉ. मनमोहन सिंग स्वतः पंतप्रधान असताना मात्र त्यांनी अर्थसंकल्प सादर केला नाही.) आणि या सगळ्या काळात मोण्टेकसिंग अहलुवालिया प्रशासकीय दृष्ट्या कार्यरत होते ...

या संपर्कातून असेल कदाचित; पण आधी कुठेही न आलेली या तिघांची विधाने या पुस्तकात येतात ...

राजीव गांधी यांच्या पंतप्रधान म्हणून पहिल्यावहिल्या अमेरिकी दौऱ्यातले मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनिअर) यांचा संदर्भ देत आलेले 'I am young and I have dreams' ....

डॉ . मनमोहन सिंग यांचे .... 'Politicians have to be in power long enough to act like Statesman.' हे विधान ....

हे वाक्य वाचत असताना डॉ. मनमोहन सिंग तब्बल १० वर्षे आपले पंतप्रधान होते .... त्यांचा आर्थिक सल्लागार ते पंतप्रधान व्हाया नियोजन मंडळ – रिझर्व्ह बँक गव्हर्नर – अर्थमंत्री हा अनुभव ....

विश्वनाथ प्रताप सिंग यांनी अर्थकारणाची केलेली व्याख्या तर अक्षरशः अफलातून आहे ... मोण्टेकसिंग अहलुवालिया त्यांच्या या पुस्तकात सांगतात की, एकदा विश्वनाथ प्रताप सिंग त्यांना म्हणाले की....'What we need is Growth that falls like raindrops on the mountain and flows down in streams to the valley and plains below ; and not the growth that is like snow which sticks to the mountain tops.'

अशाही अर्थाने हे पुस्तक .... 'विचारांती असे ठरते की ! ! ! ! !'

असं असूनही 'या तिघांचीही कारकीर्द चुटपुट लावून जाते' हा मुद्दाही मोण्टेकसिंग अहलुवालिया

त्यांच्या या पुस्तकात सविस्तरपणे मांडतात. हा पैलू मांडताना ते मिखाइल गोर्बोचेवच्या विधानाचा दाखला देतात .... You can not stop in the middle of a cavalry charge. गोर्बोचेव यांचे हे विधान आर्थिक सुधारणांच्या अंमलबजावणीच्या संदर्भातले आहे. हाच मुद्दा पुढे नेत अहलुवालिया सुचवतात की, 'गार्बोचेव, विश्वनाथ प्रतापसिंग, राजीव गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या राजकीय उतरणीस आर्थिक सुधारणा (पेरेस्त्रौईका) कारणीभूत नसून राजकीय उलाढाली (ग्लासनॉस्ट) जास्त कारणीभूत आहेत.'

याबाबत डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीचे वर्णन 'A tale of two Governments' असं करतात ... अगदी सौदाहरण व सविस्तर ...

अर्थात तेच राजीव गांधी आणि विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या बाबतीतही या पुस्तकात घडते ...

अशावेळी याच पुस्तकातले 'Politics usually eats Economics for breakfast' हे वाक्य आठवायला लागते .... कधीच न विसरण्यासाठी.

अशाही अर्थाने हे पुस्तक म्हणजे .... 'विचारांती असे ठरते की ! ! ! ! '

विचारांती असे ठरते की ! ! ! !

**– चन्द्रशेखर टिळक**
सी –४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन – ४२१२०१
भ्रमणध्वनी – ९८२०२९२३७६

●●●

(पृष्ठ क्र. ९ वरून - **निमित्त : जागतिक ग्रंथ दिन**)

हाच विचार भारतीय परंपरेत समर्थ रामदासांनी वेगळ्या पद्धतीने मांडला...

दिसामाजी काहीतरी ते लिहावे

प्रसंगी अखंडित वाचीत जावे ।

**– प्रा. नारायण बारसे**
ग्रंथपाल,
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे

●●●

(पृष्ठ क्र. १७ वरून - **निकिता ख्रुश्चेव : भारताचा मित्र व सोव्हिएत संघात उदारमतवाद आणणारा नेता**)

मित्र म्हणून सदैव स्मरणात राहील. १९५५ साली ख्रुश्चेव व बुल्गानिन जेव्हा भारताच्या दौऱ्यावर आले होते तेव्हा त्यांनी पंजाब, मुंबई, बंगलोर, मद्रास (सध्याचे चेन्नई) व कलकत्ता (सध्याचे कोलकाता) आदी ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. ख्रुश्चेवने गोव्याच्या प्रश्नावरून देखील भारताच्या भूमिकेला पाठिंबा दिला होता.

**संदर्भ:**

द सेकंड वर्ल्ड वॉर : अँटनी बीव्हर

तिसरी क्रांती : अरुण साधू

चायना अ न्यू हिस्ट्री : जॉन किंग फेअरबँक व मेरल गोल्डमन

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

●●●

पैज लावायची तर स्वतः सोबतच लावा; कारण जिंकलात तर स्वत:चा आत्मविश्वास जिंकाल आणि हरलात तर स्वत:चाच अहंकार हराल!

# निर्णय

*निर्णय घेण्याअगोदर काय चूक व काय बरोबर त्याचा सारासार विचार - विनिमय केल्याशिवाय निर्णय घेता येत नाही. याबद्दल लेखकाने या लेखात सांगितले आहे - संपादक*

मनुष्याच्या जीवनात कुठल्याही वेळी, कुठल्याही क्षणी निर्णय हा घ्यावाच लागतो. छोटा असो किंवा मोठा निर्णय घेण्याची वेळ ही येतेच. निर्णय घेण्याअगोदर काय चूक व काय बरोबर ह्याचा सारासार विचार - विनिमय केल्याशिवाय निर्णय घेता येत नाही.

निर्णय घेणाऱ्या व्यक्तीच्या विचारांची आणि मनाची घालमेल ही होत असते, कारण घेतलेला निर्णय चुकला तर त्याचा परिणाम एकतर त्या व्यक्तीवर पडतो किंवा त्याच्या निगडित असलेल्या व्यक्ती अथवा समूहावर पडतो. निर्णय हा व्यक्तिगत आणि सामूहिकरित्या घेता येतो.

जसे कुठली नोकरी निवडायची हा व्यक्तीगत निर्णय आहे; तसाच जर एखाद्या कुटुंबप्रमुखानी घेतला घर बदली करण्याचा निर्णय तर हा संपूर्ण कुटुंबाशी निगडित सामूहिक निर्णय असतो.

उदाहरण द्यायचे लागले तर, कोरोनाच्या अनुषंगाने राष्ट्रांचा विचार केला तर रूस अर्थात रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतीन यांनी घेतलेला निर्णय की,- रशियाच्या लोकांनी एकतर १५ दिवस घरी थांबावे अथवा ५ वर्षे कारावासात राहावे. तसेच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २२ मार्च २०२० रोजी जनता कर्फ्यु घेतलेला निर्णय..असे अनेक निर्णय क्रांतिकारी, राजकारणी यांनी घेतले आहेत.

निर्णय आपल्याला सगळ्याच क्षेत्रात पाहायला मिळतो. मग ते क्षेत्र शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैधानिक असो... निर्णय हा येतोच.

निर्णय घेणारी व्यक्ती ही परिपूर्ण विचार करणारी असावी, सर्व बाबींचा सखोल अभ्यास करणारी असावी, व्यक्तीगत अथवा सामूहिक निर्णय ह्याच्या दुष्परिणामांची योग्य आकलन करणारी असावी. मग ती व्यक्ती राष्ट्राचा प्रमुख असो, संस्थेचा अध्यक्ष असो, प्राचार्य असो अथवा सुरक्षायंत्रणा सांभाळणारा समन्वयक असो, निर्णय हा घ्यावाच लागतो. निर्णय घेतल्यानंतर तो कोणाला कठोर वाटतो तर कोणाला मवाळ वाटू शकतो.

निर्णय जरी तीन अक्षरी शब्द आहे; पण त्याच्या परिणामाची व्याप्ती ही अफाट आहे.

निर्णयामध्ये सकारात्मक आणि नकारात्मक गोष्टी दडलेल्या आहेत, त्या निर्णय घेतल्या नंतरच कळतात.

सध्याचं उदाहरण घ्या, कोरोनाचा हाहाकार संपूर्ण देशात चाललाय. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक यंत्रणा आणि मनुष्य बळ झटत आहेत. सरकार चालवणाऱ्या प्रमुखांची जवाबदारी ही मोठी आहे. कारण त्यांनी घेतलेले एक-एक निर्णय लोकांमध्ये खूप मोठा मानसिक फरक आणि वैचारिक बदल पाडू शकतात, अशावेळी चुकीचा निर्णय घेतल्यामुळे परिस्थिती अजून खालावू शकते.

तर सामूहिक निर्णय घेणारी व्यक्ती ही मुळात संयमी, भविष्याचा विचार करणारी, संकटाचे सगळे आयाम पडताळून पाहणारी पाहिजे.

मनुष्याचं जीवन हे अनेक प्रवाहांतून पुढे जात असतं. त्यात कधी कधी निर्णय चुकतातही, पण ह्या

चुकांतूनच मनुष्य पुढचा निर्णय घेण्याच्या वेळी सतर्क राहतो आणि योग्य पर्यायांचा विचार करून निर्णय घेतो.

निर्णय घेताना तो अनेक पैलूंवर आधारित असतो. जसा की विचारसरणी, मानसिकता, परिस्थिती, परिणाम, जिद्द...

अशाच जिद्दीच्या जोरावर १९३५ साली ठाण्यातील लोकप्रिय व्यक्ती डॉ. नारायण वासुदेव बेडेकर साहेब म्हणजे आपले मोठे डॉक्टर होत, त्यांनी एक अफाट निर्णय घेतला तो म्हणजे ज्ञानाच्या स्रोताला विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून वाट करून देण्याचा. बघता बघता ह्या निर्णयाचा वेलू गगनावरी गेला! त्या निर्णयाचे अमृत आपणच काय, पण पुढील अनेक पिढ्यांना मिळतच राहणार आहे. ठाण्यात अग्रगण्य शिक्षणाचं माहेर घर विचाराल तर विद्या प्रसारक मंडळाचे नाव आपसूक ओठांवर येतं.

त्यांच्याच पार्श्वभूमीवर दुसरा महत्त्वाकांक्षी शिक्षणाचा निर्णय मी बघितला तो म्हणजे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय वासुदेव बेडेकर सर यांनी घेतलेला आणि तो म्हणजे वेळणेश्वर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचा. निर्णयाच्या पाठाचा हेतू म्हणजे कोकणात सुसज्ज आणि अत्याधुनीक सुविधांनी परिपूर्ण असलेलं शिक्षण देण्याचा, विद्यार्थ्यांना चांगला माणूस घडवण्याचा, स्थानिक गावकऱ्यांना दोन पैसे मिळवून देण्याचा आणि कोकणातल्या शैक्षणिक क्षेत्रात 'विद्या प्रसारक मंडळा'चा खारीचा वाटा हा एवढाच..

२०२० च्या जानेवारी महिन्यात जोशी-बेडेकर महाविद्यालयाचा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एक भेट महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाला द्यायची असं ठरलं होतं. त्या भेटीदरम्यान प्रत्यक्षात डॉ. विजय बेडेकर सर यांनी ज्या आत्मविश्वासाने निर्णय घेतला त्याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला. भव्य अती भव्य अशी ती वास्तू आणि त्याचबरोबर कुठेही सुविधांची तडजोड न करता खरोखर विद्यार्थ्यांसाठी एक परिपूर्ण वातावरण निर्माण केले आहे असे हे ठिकाण. महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट ही माझ्यासाठी पर्वणीच होती.

तर मंडळी, निर्णय हा खूप मौल्यवान आहे. तो योग्य वेळी आणि योग्य मार्गानेच अमलात आणावा. आपली बुद्धिमत्ता, चाणाक्ष नीती, कटाक्ष, नजर, उचित निवड, कार्यक्षमता हे सर्व आपल्या निर्णयाचे केंद्रबिंदू असायलाच हवेत तरच आपण घेणारे निर्णय हे सकारात्मक होतील.

धन्यवाद....

**– स्वप्नील नंदकुमार मयेकर**
सुरक्षाकक्ष समन्वयक
विप्रमं महाविद्यालय परिसर, ठाणे
भ्रमणध्वनी – ९९२००८५८३७

•••

दिशा
नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

तुमचा आजचा संघर्ष तुमचे उद्याचे सामर्थ निर्माण करतो. त्यामुळे विचार बदला आणि बदला तुमचे आयुष्य!

# लोकशिक्षणामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व

*लोकशिक्षणामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व या लेखात विशद केले आहे- संपादक*

सुशिक्षित व आपल्या कर्तव्याचे भान असणारा जबाबदार नागरिक प्रामुख्याने शिक्षणाच्या माध्यमातूनच आकारास येत असतो. शिक्षित आणि समर्थ अशा नागरिकांमुळेच समाज्याची प्रगती होत असते.फावल्या वेळात मनुष्य प्राण्याला योग्य मनोरंजनाची गरज असते. हे मनोरंजनसुद्धा विधायक व रचनात्मक असले पाहिजे. अन्यथा मनुष्याचे मन विध्वंसक आणि नकारात्मक गोष्टींकडे वळण्याची शक्यता असते. एकूणच मनुष्याचे जीवन सांस्कृतिकदृष्ट्या परिपूर्ण व संपन्न होईल आणि काही चिरंतन मूल्यांवर अधिष्ठित राहील हेच आपल्या सर्वांचे ध्येय व उद्दिष्ट असले पाहिजे आणि तशा प्रकारचे निरोगी वातावरण समाजात निर्माण करणे ही आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

समाजाला प्रगतीपथावर नेण्याची प्रेरणा आणि त्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान व संस्कार हे दोन्ही ग्रंथालयाद्वारे समाजाला उपलब्ध होत असतात. अनौपचारिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्याची जबाबदारी सार्वजनिक ग्रंथालयांवर पडते. लोकशिक्षण किंवा समाजशिक्षण हेही अनौपचारिक शिक्षणात अंतर्भूत होत असल्याने सार्वजनिक ग्रंथालये ही शिक्षणाची महत्त्वपूर्ण केंद्रे आहेत. विशेषतः भारतासारख्या ग्रामीण व मागास अशा विकसनशील देशात खेड्यांतील लोकांना अनेक प्रकारांनी मार्गदर्शन करण्याचा सुलभ उपाय म्हणजे सार्वजनिक ग्रंथालय होय.

**श्रमिकांचे शिक्षण**

भारतामध्ये तसेच जगातील इतर विकसनशील राष्ट्रांमध्ये एक मोठा वर्ग आहे तो म्हणजे कामगार वर्ग. अनेक उद्योगधंद्यात, छोट्यामोठ्या कारखान्यांमध्ये लक्षावधी कामगार काम करीत असतात, काही कुशल कारागीरही असतात. अशा श्रमिकांसाठी आपल्या संग्रहात उपयोगी पडतील असे ग्रंथ ठेवावेत. ग्रंथालयातील अशा पुस्तकांच्या वाचनामुळे श्रमजीवी वर्गातील लोकांना आपल्या व्यवसायाबद्दलचे ज्ञान मिळेल व त्यांची व्यावसायिक कार्यक्षमता वाढीस लागेल. यामुळे एकंदर उत्पादकता वाढीस लागेल आणि राष्ट्राच्या विकासाला ते उपकारक ठरेल. या दृष्टीने सार्वजनिक ग्रंथालये महत्त्वाची कामगिरी बजावू शकतात.

**ग्रंथालय व संशोधक**

संशोधन करणाऱ्या संस्थांशी संलग्न असलेल्या प्रत्येक ग्रंथालयात नियतकालिकांचा संग्रह असणे आवश्यक असते. संशोधनास त्यांची मोलाची मदत होत असते. या दृष्टीने विद्यापीठातील ग्रंथालये, संशोधन संस्थांमधील ग्रंथालये, तसेच मोठ्या उद्योगव्यवसायांच्या संशोधन शाखांमधील ग्रंथालये फार महत्त्वाची कामगिरी करीत असतात. इतर ग्रंथालयेही कोणत्या ना कोणत्या प्रकारे संशोधनाला साहाय्य करीतच असतात. अगदी सार्वजनिक ग्रंथालये देखील मानवविद्या व सामाजिक शास्त्रातील संशोधनास सहाय्य करीत असतात.

**ग्रंथालय व सांस्कृतिक क्षेत्र**

ग्रंथालय दोन दृष्टीने कार्य करीत असतात. एक म्हणजे, अशा ग्रंथांच्या वाचनामुळे अंगी कलागुण

किंवा सर्जनशीलता असणाऱ्या व्यक्तींना मार्गदर्शन मिळू शकते व त्यांच्या कलागुणांचा तसेच सौंदर्यशास्त्रीय अभिरुचीचा विकास घडू शकतो.

दुसरे म्हणजे, ग्रंथालये स्वतःही संगीतसभा, सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा इ. ज्ञानविकासात्मक कार्यक्रम घडवून आणीत असतात. त्यातून वाचकांना आपल्या देशाच्या, विभागाच्या संपन्न परंपरांचा परिचय होत असतो. विशेषतः ग्रामीण विभागात वाचनालय हे त्या गावचे जणू एक सांस्कृतिक केंद्रच असते.कारण ज्ञान, वक्तृत्व, कला, संगीत, संस्कृती इ. गोष्टींची चर्चा वा प्रबोधन करणारी दुसरी संस्था खेड्यांतून क्वचितच असते. विशेषतः असे कार्यक्रम आयोजित करून जनजीवन सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालयांच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होते.

**ग्रंथालय व माहिती संप्रेषण**

ग्रंथालय हे मूलतः त्यातील पुस्तके व इतर वाचनसाहित्य संग्रहामुळे एक माहिती केंद्रच असते. समाज विकासाच्या दृष्टीने होणाऱ्या प्रत्येक मानवी कार्यक्रमासाठी माहिती ही अगदी महत्त्वाची प्राथमिक गोष्ट आहे. संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, प्रशासक, औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रातील व्यवस्थापक, कलावंत एवढेच नव्हे तर शेतकरी, मजूर आदी सर्वांनाच माहितीची गरज असते. आपआपले व्यवसाय अधिक कार्यक्षमतेने व कुशलतेने करण्यासाठी माहितीचा सर्वांनाच उपयोग होत असतो. अशा प्रकारचे उपयुक्त माहिती पुरविणारे ग्रंथ व वाचन-साहित्य मिळविणे व गरजू वाचकांना मागणीनुसार त्याचे वितरण करणे हेच ग्रंथालयांचे अंगभूत कार्य असते. नोकरी-व्यवसायाची गरज असणाऱ्या तरुणांसाठी व्यवसाय मार्गदर्शनपर साहित्य, स्वतःचा उद्योगधंदा सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी 'डू-इट-युवर सेल्फ' सारखी माहितीपर पुस्तके अशा प्रकारच्या पुस्तकांद्वारे ग्रंथालय विविध प्रकारची उपयुक्त माहिती आपल्या वाचकांना पुरवीत असते. थोडक्यात, ग्रंथालय हे इतके समृद्ध व संपन्न असले पाहिजे की , समाजातील बहुविध घटकांना आवश्यक ती माहिती तेथे उपलब्ध झाली पाहिजे.

**ग्रंथालय व अध्यात्म, तत्त्वज्ञान**

पुस्तकांचे साधारणपणे तीन प्रकार पडतात. माहितीपर पुस्तके, मनोरंजनपर पुस्तके आणि प्रेरणादायी पुस्तके. धार्मिक किंवा तत्त्वचिंतनपर ग्रंथामधून शाश्वत मूल्यांचे विवेचन असते व त्यामुळे त्यांना अक्षरग्रंथ किंवा अभिजात साहित्य म्हणून संबोधले जाते. हीच प्रेरणादायी पुस्तके होत. भगवद्गीता, ज्ञानेश्वरी अशा प्रकारचे ग्रंथ आहेत. असे ग्रंथ समाजातील विचारशील व्यक्तींची ज्ञानाची तहान भागवीत असतात, तात्विक गोष्टींचे विवेचन करीत असतात. या प्रकारच्या वाचनात रस असणाराही एक वाचकवर्ग असतो. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांमधून धार्मिक आध्यात्मिक विषयांवरील वेचक पुस्तकांचा संग्रह असणे आवश्यक होय. अशा पुस्तकांच्या वाचनाने मनुष्याचे जीवन मूल्यात्मक दृष्ट्या संपन्न होते. त्याचा परिणाम म्हणून साहजिकच आचरण उदात्त होते.त्याला नैतिक अधिष्ठान लाभते.

**ग्रंथालय व मनोरंजन**

प्रत्येकाला निकोप असे संस्कारी मनोरंजन मिळण्याची गरज आहे. हे काम ग्रंथालयातील उत्कृष्ट चरित्र वाङ्मय, ललित साहित्य, प्रवासवर्णने, लोकप्रिय मासिके यांद्वारे होत असते. म्हणून अन्य प्रकारचे साहित्य ग्रंथालयात असणे आवश्यक आहे.त्या खेरीज मनाच्या मशागतीला पोषक असे करमणुकीचे कार्यक्रम उदा.- संगीताच्या मैफिली, व्याख्यानमाला वगैरे कार्यक्रम ग्रंथालयांनी आयोजित करावेत.

---

ज्याला संधी मिळते तो नशीबवान. जो संधी निर्माण करतो तो बुद्धिवान.
आणि जो संधीचे सोने करतो तो विजेता.

**ग्रंथालय आणि समाज परिवर्तन**

आजचा समाज नजीकच्या काळात माहितीप्रधान समाज म्हणून ओळखला जाईल अशी वाटचाल करीत आहे.याचा अर्थ असा की, आत्ता समाज्याच्या विकास व प्रगतीचे मूळ सूत्र हे विविध क्षेत्रांतील तात्विक व तांत्रिक ज्ञान आणि माहिती हेच राहिल. त्या आधारेच समाज विकासाची धोरणे ठरविणे, त्याची अंमलबजावणी करणे, समाज्याची पुनर्बांधणी करणे इ. कार्ये केली जातील.

शहरी व ग्रामीण, सुशिक्षित व अशिक्षित या दोघांमधील दरी कमी करावयाची असेल तर ग्रंथालयांचा लोकशिक्षणाचे माध्यम म्हणून उपयोग व्हावा, यासाठी ग्रंथालयांमध्ये काही मूलभूत बदल आवश्यक आहेत. पारंपरिक सेवा देण्याच्या पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. तरच लोकशिक्षणात ग्रंथालयांचा वापर होऊ शकेल. ज्ञान देण्याच्या साहित्यांमध्ये बदल केला पाहिजे व नवीन तंत्र अवलंबिले पाहिजे. समाज्यातल्या प्रत्येक थरातील लोकांना नवे विचार, नवी माहिती सहज समजेल अशा पद्धतीचे तंत्र स्वीकारावे.

ग्रंथालयांनी लोकशिक्षणाचे कार्य केले तर समाज्यात विचारांची देवाणघेवाण जास्त प्रमाणात होऊन परस्परात सामंजस्य वाढविण्यास मदत होईल. त्याचबरोबर लोकशिक्षणाचे माध्यम म्हणून ग्रंथालयांचा वापर समाजामध्ये जागृती निर्माण करून, प्रत्येकाला स्वतःच्या विकासाचा विचार करण्यासाठी केला जाईल. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ग्रंथालयाचे कार्य हे सामाजिक बदल व त्याच्या विकासाचा मध्यबिंदू धरून अपेक्षित आहे. या कार्यात यश प्राप्त करण्यासाठी ग्रंथालयांनी फक्त ग्रंथ, नियतकालिके या वाचनसाहित्यात वाढ करून चालणार नाही, तर त्यासोबत इतर साहित्य उदा. पोस्टर्स, चलचित्रे, फोटोग्राफ्स, लघुपट या प्रकारच्या साहित्यात वाढ केली पाहिजे. अशा प्रकारे ग्रंथालये ही खरोखर लोकशिक्षणाची प्रभावी माध्यमं ठरतील.

**– मनीषा चव्हाण**
एम.लिब.
(ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ
माजी ग्रंथपाल)
दूरध्वनी –९१७२४४८८७८
Email : manisha.chavan801gmail.com

●●●

## पदर

स्त्री आणि साडीचं नात हे खूप वेगळं आणि न तुटणारं आहे. माझ्या आईकडून शिकलो हे की, साडीचा महत्त्वाचा भाग म्हणजे साडीचा पदर.

लहान असताना अमृत पिण्याचा हक्क ह्याच पदराखाली आपण बजावतो. अजून मोठे झालो की डाळ व भात खाताना ह्याच पदराने आई आपले तोंड पुसते.. अजून मोठे झालो की रस्त्याने चालता ह्याच पदराचं टोक पकडून आपण शाळेत जातो... अजून मोठे झालो की जेवणानंतर नकळत आईच्या पदराला हात पुसतो.. अजून मोठे झालो आणि बाबा ओरडले की, सुरक्षा कवच म्हणजे आईचा पदर असतो लपण्यासाठी..बाळाला थंडीपासून हाच पदर बचाव करतो आणि उन्हातही..

हाच पदर घेऊन आई सौभाग्याचं लेण ओटीसाठी पदर पुढे करते आणि कठीण प्रसंगी हाच पदर आई कमरेत खोचून कामाला तयार राहते.

असा हा साडीचा पदर खूप उपयोगी आणि हो; महिला वर्ग हाच पदर बघूनच साड्या पसंद करतात, हे माझ्या लग्नानंतर मी अनुभवलंय!

**– स्वप्नील नंदकुमार मयेकर**

# आदिबंध

*आदिबंधाची संकल्पना समजून घेण्यासाठी मानसशास्त्र, मुख्यत्वे मनोविश्लेषणात्मक मानसशास्त्राची पूर्वपीठिका थोडी समजून घेणे आवश्यक आहे. याविषयीचे लेखिकेने आपले विचार या लेखात मांडले आहेत – संपादक*

दृश्य १ – सामान्य परिस्थितीमधील संध्याकाळी ५ वाजताची छशिम ते बदलापूर अशी लोकल गाडी. महा यातायात करून एका चिमुरडीचे वडील एक छानसा केक घेऊन, तिच्या वाढदिवसासाठी लोकल वेळेत पकडण्यासाठी धावत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर काय भाव आहेत ह्याचा आपण सहज अंदाज करू शकतो.

दृश्य २ – तालुक्याचा आठवडा बाजार. आपल्या चिल्यापिल्यासाठी शेवगाठी आणि इतर घरसामान घेऊन, थोडा पैका गाठीला बांधून, एक खेडूत संध्याकाळची शेवटची एस. टी. पकडण्यासाठी भरभर पावले उचलत आहे. त्याच्या चेहऱ्यावर काय भाव आहेत, ह्याचा आपण सहज अंदाज करू शकतो.

दृश्य ३ – प्रागैतिहासिक काळातील गुहेत राहणारा आदिमानव. शिकारीसाठी दिवसभर जंगलातून वणवण फरफटत राहिलेला. अखेर शिकार मिळाल्यावर आनंदून भराभरा सूर्यास्ताच्या आत जंगल तुडवत गुहेपर्यंत पोचायच्या अट्टाहासात मग्न असलेला आदिमानव. त्याच्याही ओबडधोबड चेहऱ्याचेभाव आपण सहज अंदाज करू शकतो.

अर्थातच ह्या काळ आणि स्थळ ह्यात खूप अंतर असणाऱ्या प्रसंगांमध्येही एक खूपच महत्त्वाचा दुवा आहे. तो दुवा म्हणजे 'घरची ओढ', अथवा त्या तिन्ही मंडळींच्या (बापांच्या) मनात असलेलं 'घर' – मानसशास्त्रात ज्याला 'आदिबंध' (Archtype) म्हणून संबोधले जाते. आदिबंधाची संकल्पना समजून घेण्यासाठी आपल्याला मानसशास्त्र, मुख्यत्वे मनोविश्लेषणात्मक मानसशास्त्राची पूर्वपीठिका थोडी समजून घेणे आवश्यक आहे.

डॉ. सिग्मंड फ्रॉइड यांनी पाश्चात्य बौद्धिक परंपरेमध्ये प्रथमच मानवी मनाचा नकाशा मांडला. ज्यात फ्रॉइडने मानवी मनाची तुलना हिमनगाशी केली. ज्याप्रमाणे समुद्रात वाहणाऱ्या हिमनगाचा केवळ १/८ (अष्टमांश) भाग पाण्यावर दिसतो तर उरलेला ७/८ (सात अष्टमांश) भाग समुद्रात, न दिसणारा असतो. त्याचप्रमाणे मानवी मनाचे 'जाणीव' व 'नेणीव' (अबोध मन) असे दोन प्रमुख भाग त्यांनी सांगितले. अबोध मनाचा पुरावा म्हणून त्याने स्वप्ने, बोलण्यातील अनाहूत चुका (slip of tongue) यांच्याकडे निर्देश केला. फ्रॉइडच्या शब्दात, Your tongue never slips. It is necessarily slip of your mind.'

खरे तर फ्रॉइडच्या अबोध मनाचा सिद्धांत हा एका स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे, पण सध्या आपल्या कामासाठी व्यक्ती-व्यक्तींचे अबोध मन ही महत्त्वपूर्ण संकल्पना आहे.

जाता जाता इथे एक महत्त्वाचा संदर्भ आठवला, फ्रॉइड व आइनस्टाईन हे समकालीन होते. त्यांचा एकमेकांशी पत्रव्यवहर होता (जो प्रसिद्ध आहे). फ्रॉइडने आइनस्टाईनच्या केलेल्या स्तुतीला उत्तर देताना आइनस्टाईन लिहितात, 'मी दृश्य जगाचा, सहज पुरावे उपलब्ध होऊ शकतील, निरीक्षणे करता येतील अशा जगाचा वेध घेतला आहे. पण तुम्ही तर न दिसणाऱ्या, सहजी न जाणवणाऱ्या मानवी मनाला / अबोध दुनियेला

कवेत घेण्यात, अदृश्याला दृश्य / भासमान करण्यात यश मिळवलं आहे. जे खचितच वंदनीय आहे.'

असो; तर फ्रॉइडच्या दोन महत्त्वाच्या शिष्यानी अबोध मनाची संकल्पना अधिक पुढे नेली. हे दोन पट्टशिष्य म्हणजे ॲडलर आणि ह्युन्ग (Jung). ह्यापैकी ॲडलरने जगाला 'न्यूनगंड' दिला. म्हणजेच त्याने 'अहंगंड' आणि 'न्यूनगंड' ह्या अबोध मनात असणाऱ्या आदिम संकल्पना मांडल्या व ह्युन्गने त्याच्या गुरूच्या (फ्रॉइडच्या) पुढे जात वैयक्तिकच नव्हे तर सामूहिक अबोध मनाची कल्पना मांडली 'collective unconscious'. जिथे लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा असतात, काही अशा कल्पना तिथे नांदत असतात, की ज्या सर्व मानवजातीला वा काही विशिष्ट संस्कृतींना बांधून ठेवत असतात. ह्या कल्पना म्हणजे 'आदिबंध'. मानवी संस्कृतीची तुलना जर का आपण विणलेल्या भरजरी वस्त्राशी केली तर त्यातील एक एक धागा म्हणजे हा 'आदिबंध' असतो. अशी मांडणी ह्युन्गने केली.

वरील तीनही काल्पनिक दृश्यांमधून आपल्याला 'घर' अथवा 'घराची ओढ' हा आदिबंध अग्गोचर होतो. ह्या व अशा आदिबंधाचा साहित्य, कला, भाषा ह्यांच्याद्वारे मागोवा घेणे खूपच रोचक असू शकते. कारण आदिबंध संपूर्ण मानवी संस्कृतीला व्यापून असतात. तर संस्कृती कधी विशिष्टही असतात. त्याविषयी थोडे पुढे जाऊन बोलू. वरती म्हटल्याप्रमाणे हा आदिबंधही अनेक अंगांनी आपल्या लोककलांमध्ये, भाषेत, साहित्यात व अर्थात जनमानसात पाझरलेला दिसतो.

हीच गंमत पहा ना, अगदी बहुमजली इमारतीत (skyrise) असलेल्या मुलाला 'घराचे चित्र काढ' सांगितले की, कौलारू घराचेच चित्र काढते! का? अर्थात पिढ्यांनपिढ्या त्यांच्यामध्ये झिरपलेल्या आदिबंधामुळे! आता आपण काही लोकप्रिय गाणी, कवितांमध्ये येणारी 'घर' ही कल्पना पाहू.

- 'ये तेरा घर ये मेरा घर, किसीको देखना अगर, तो पहिले आके मांगले, तेरी नजर मेरी नजर' हे नवोढेने म्हटलेलं 'साथ साथ' चे गाणे.
- 'एक घर बनाउंगा, तेरे घर के सामने' हे नायकाने नायिकेला दाखवलेलं स्वप्नचित्र.
- 'मेरे घर आना जिंदगी.. मेरे घर का सिधासा इतना पता हैं.. मेरे घर के आगे मोहब्बत लिखा हैं..' ही गुलजारांची आळवणी.

किंवा मराठीतील काही गाणी, गोष्टी, कवितांच्या ओळी उदाहरणार्थ,

- घराचा पहिला संदर्भ मराठीत / प्राकृतात येतो तो चक्रधर स्वामींच्या चिऊकाऊच्या गोष्टीचा. चिऊचं घर शेणाचं.
- 'जिवलगा राहिले दूर घर माझे, पाऊल थकले माथ्यावरचे जड झाले ओझे'
- 'घरात हसरे तारे असता.. मी पाहू कशाला नभाकडे..'
- 'नसतेस घरी तू जेव्हा, जीव..थोडा थोडा होतो', वगैरे वगैरे (इच्छुक वाचक ही यादी कितीही लांबवू शकतात.)

इथे मुद्दाम काही लोकप्रिय गीतांची उदाहरणे घेतली आहेत.

तसेच, आपल्या रोजच्या भाषेतही कितीतरी शब्द, वाक्प्रचार, म्हणी ('घर') ह्या आदिबंधाच्या अनुषंगाने निर्माण झाल्या आहेत. उदाहरणार्थ, House is built by walls, but home is built by hearts किंवा 'घराचा

मधला खांब', 'घराचे वासे फिरणं', घराची वाट धरणे, घरगृहस्थी, गृहस्वामींनी, 'रिकामे घर खायला उठणे' , आणि ह्यावरूनच कवी ग्रेसांची सुंदर पण सहजी जीवनाच्या संध्याकालापर्यंत पोचलेल्या घराबद्दलची ही ओळ, 'घर थकलेले संन्यासी...' तसेच डॉ. आनंद नाडकर्णींचे पुस्तक 'लेखकाचे घर'. मानवी जीवनप्रवासाच्या अंतिम टप्प्याविषयीसुद्धा ह्या घरालाच अनुलक्षून मृत्युविषयी एक शब्दप्रयोग येतो, 'निजधामास जाणे' (नित्य / कायमच्या घरी जाणे). घर व मृत्यू ह्या दोन आदिबंधंना बेमालूम काव्यात्मपणे जोडणारी कल्पना म्हणजेच, 'आता आहे तो देह, तात्पुरता, भााड्याचं उधार घर आहे. पण माझं / प्रत्येकाचं निजधाम म्हणजे ईश्वराचं घर'. घर ह्या आदिबंधाला सकारात्मक, आध्यात्मिक उंची देणारा हा शब्दप्रयोग. ह्याच अनुषंगाने मन्ना डेचे गाणे, त्यांचा दैवी स्वर मनात रुंजी घालतो,

वो दुनिया मेरे बाबुल का घर, ये दुनिया ससुराल...।

जाके बाबुल से नजरे मिलाऊ कैसे, घर जाऊ कैसे...।

आता एका (culture specific) संस्कृती विशेष आदिबंधाचा मागोवा घेऊ. प्रथम भारतीय संस्कृतीच्या संदर्भातील एक सहजसोपे उदाहरण घेऊ. ''आम्ही खूप दमून घरी आलो आणि आईने गरम गरम खिचडी बनवली.''

हे वाक्य कोणत्याही भारतीय भाषेत भाषांतरित केलं तरी त्याचा अर्थ प्रत्येक भारतीयाला चटकन कळेल. कारण भारताच्या प्रत्येक प्रांतात खिचडी बनतेच, भले रूप वेगळं असेल. पण कदाचित पाश्चात्य संस्कृतीमधील व्यक्तीला ह्या वाक्याचा नेमका अर्थबोध होणार नाही. 'दमून घरी येऊन आईच्या हातची उनउनीत खिचडी खाणे आणि तृप्त होणे...' हा खाशा भारतीय आदिबंध आहे. भारतीय संस्कृती अशा अनेक आदिबंधांनी संपृक्त आहे. नानाविध आदिबंधांची अनेक प्रारुपे आपल्या संस्कृतीत आहेत. एकतर भारत द्वीपकल्प असल्याने, अनादी काळापासून नदी आणि समुद्राच्या कुशीमध्ये भारतीय संस्कृती निर्माण झाली आणि फुलली. त्यामुळे तरंगणारे झाड, लाकूड, तराफा, होडी, जहाज हे आपला महत्त्वाचा आरंभबिंदू राहिलेला आहे. आणि अर्थातच ह्या नावेसोबत येणारे नावाडी. 'नावाडी' हा असाच एक अस्सल भारतीय (खिचडीसारखा) आदिबंध. त्यासाठी प्रत्येक वेगळ्या कोळी संस्कृतीमध्ये विविध संबोधने आहेत. कधी डोलकर, कधी नाखवा, कधी नाविक, तर कधी मॉझी आणि कधी केवट. काही लोकप्रिय गीतांतून आलेले हे संदर्भ,

- नाविका रे वारा वाहे रे, डौलाने हाक जरा आज नाव रे सांजवेळ झाली आता पैल माझे गाव रे
- डोलकर रं धाकल्या दिरा रं... चल जावया घरा

किंवा अभिजात भारतीय संगीत ज्यांच्या गळ्यात होत त्या पं. जितेंद्र अभिषेकींनी एकदम कोळी बाजात गाऊन अजरामर केलेलं

- गोमू माहेराला जाते हो नाखवा, तिच्या घोवाला कोकण दाखवा. आणि त्यातून गाण्याचाच भाग बनून आलेली 'हय्या हो' ची हाळी.

हिंदी आणि बंगाली मधील असंख्य गाणी जी 'मॉझी के गीत' म्हणून प्रसिद्ध आहेत.

ओ मॉझी रे दूर है किनारा, नदीया कि धारा.. रे .. आणि त्यात येणारा लाटांचा नाद.

ह्या आणि अशा अनेक गीतांमधून जाणवले की, 'नावाडी', 'मॉझी' हा केवळ एक सामानाची, माणसांची ने-आण करणारा कामगार नाही, तर त्याला लोकसंस्कृतीमध्ये एक विशिष्ट स्थान आहे. जसे, बंगालमध्ये गावोगावी फिरणारा, युक्तीच्या चार गोष्टी

सांगणारा 'कथाकथक' आहे, तसाच 'नाखवा' हा सखा (friend , philosopher , guide ) आहे. कधी धाकला दीर, कधी बंधो, कधी मितवा अथवा साथी आहे. एस डी बर्मन यांनी त्यांच्या अनेक सिनेगोष्टींमध्ये व संगीतामध्ये 'नावाडी' ह्या आदिबंधाचा अतिशय तरल व सुंदर वापर केला आहे. 'बंदिनी' ह्या १९६३ सालच्या चित्रपटामध्ये नायिकेची संपूर्ण मानसिक उलाढाल अशाच मॉझी गीतातून चित्रित केली आहे. सुन मेरे बंधू रे, सुन मेरे मितवा, सुन मेरे साथी रे... हेच ते गीत.

खरे तर ह्युन्गने मांडलेल्या संकल्पनेमुळे साहित्य आणि संस्कृतीचे एक नवे दालनच खुले झाले. मनाविश्लेषणात्मक परिप्रेक्षांमधील एक खास आदिबंधात्मक समीक्षा तयार झाली. मनाच्या गुहेचा तळ शोधणारी एक किल्ली सापडली (खुल जा सिम सिम).

मराठी कथाविश्वामध्ये जी ए कुलकर्णी, भारत सासणे व इतर मंडळींनी अनेक आदिबंधांचा काव्यात्म वेध घेतला आहे. घराबद्दल बोलताना गोष्ट गुलजार ह्या प्रतिभावान थोर गुणी कलावंताशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. फाळणीच्या आदेशामुळे घर सोडून आलेलं हे कुटुंब आणि त्यात गुलजारांच्या आईचं अकाली निधन. १४-१५ असं अजाण वय आणि मनाची प्रचंड उलघाल. त्यांच्या सुरुवातीच्या जवळजवळ सर्व चित्रपटांमध्ये 'दुभंग' घराचं चित्रण दिसतं. आँधी, मौसमी, किनारा किंवा तुलनेने नवा सिनेमा माचीस. दुभंग घर- दुभंग समाजाचे वैयक्तिक साक्षीदार वा कदाचित पोळलेले (sufferer) असूनही, गुलजारांनी दुभंग घराचे दुःख हा आदिबंध त्यांच्या सुंदर प्रतिभेच्या स्पर्धाने सार्वत्रिक अजरामर करून टाकला.

तर अशी ही मानवव्यापी आदिबंधाची कहाणी. चटकन आपल्या सर्वांना भावनेच्या गोफात गुंफणारी. कधी हसवणारी, कधी रडवणारी तर कधी अंतर्मुख करणारी आणि आध्यात्मिक अनुभूती देणारी. नावाडी ह्या आदिबंधाशी जोडलेल्या अशाच एका अंतर्मुख करणाऱ्या वर्णनपर गीताने लेखाची सांगता करते. अनुप जलोटा यांनी गायलेलं प्रसिद्ध भजन, 'कभी कभी भगवान को भी भक्तो से काम पडे..., जाना था गंगापार प्रभू केवळ कि ना चढे...।' वनवासाला निघालेले राम, लक्ष्मण व सीतामैय्या 'केवट' (नावाडी) च्या नावेत चढतात. तो हरखून जातो. त्यांची पूजा करतो. भोळ्या भक्तीभावाने आपली नाव सजवतो आणि प्रभू रामचंद्रांना गंगापार करतो. प्रभू रामचंद्र त्याला विचारतात, 'तुला बिदागी काय देऊ?' त्यावेळी अत्यंत तत्परतेने केवट म्हणतो, ''मला काही नको रामराया. फक्त एक करा. ही गंगा नदी पार करायला मी तुम्हाला निमित्तमात्र झाले. आता भवनदी (ज्ञानोबा माउलींची मायानदी) पार करायला तुम्ही माझे नावाडी व्हा. बस इतकंच करा प्रभू!''

**- प्रा. डॉ. सुचित्रा नाईक**
जोशी-बेडेकर महाविद्यालय,
ठाणे

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

अनेक अपयशांची कारणीभूत बाब म्हणजे माणसाचा स्वभाव. ते जेव्हा प्रयत्न सोडतात तेव्हा आपण यशाच्या किती जवळ आहोत याची त्यांना कल्पना नसते!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### डॉ. वा. ना. बेडेकर' स्मृती व्याख्यानमाला साजरी

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात 'डॉ. वा. ना. बेडेकर' स्मृती व्याख्यानमालेत डॉ. नानाजी शेवाळे यांचे 'भारतातील सामाजिक-आर्थिक घडामोडी : गोखले अर्थशास्त्र संस्था व धनंजयराव गाडगीळ ग्रंथालयाचे योगदान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

लॉकडाऊनच्या काळातील वा. ना बेडेकर व्याख्यानमालेचे हे २३ वे पुष्प ऑनलाईन झूम ॲप्लिकेशनवर पार पडले. ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशात मोलाची भर घालणाऱ्या विद्या प्रसारक मंडळाचे अध्वर्यू राहिलेल्या स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या तपस्वी जीवनाला श्रद्धांजली म्हणून ही व्याख्यानमाला जोशी बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केली. डॉ. नानाजी शेवाळे यांनी ब्रिटिश ग्रंथालय, पुणे येथे सहाय्यक व्यवस्थापक म्हणून काम पाहिले असून, २००९ पासून ते गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे येथे वरिष्ठ ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.

अर्थशास्त्राचे संशोधन व प्रशिक्षण देणारी भारतामधील सर्वात जुनी संस्था म्हणून गोखले अर्थशास्त्र संस्था ओळखली जाते. भारताच्या आर्थिक आणि राजकीय समस्यांबद्दल संशोधन करण्यासाठी आणि या विषयांत संशोधन करणाऱ्या कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी या संस्थेची स्थापना केली गेली. आतापर्यंत ग्रंथालयात जवळपास २ लाख ८० हजार पुस्तकांचा संग्रह आहे, अशी माहिती वरिष्ठ ग्रंथपाल नानाजी शेवाळे यांनी दिली.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी केले. प्रा. प्राची नितनवरे यांनी या ऑनलाईन व्याख्यानाची तांत्रिक बाजू सांभाळली. ग्रंथपाल नारायण बारसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य, सर्व समन्वयक, प्राध्यापक यांनी या ऑनलाईन व्याख्यानात सहभाग घेतला.

**९ मार्च**

कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संगीता दीक्षित यांना ठाणे गौरव सेवा प्रतिष्ठान आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्या तर्फे 'ती' महोत्सवमध्ये शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.

**९ मार्च**

The Department of Banking and Insurance च्या वतीने "Basics of Bank and Insurance Marketing" या १४ दिवसीय ब्रीज कोर्सचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. प्रियंवदा टोकेकर व डॉ. मृण्मयी थत्ते यांच्या हस्ते झाले. प्रा. अर्चना नायर यांनी संयोजन केले.

**१३ मार्च**

Women Development Cell (WDC) च्या वतीने मुंबई महानगरपालिका येथील अभियंता संदीप कोलले यांचा सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.

**१४ मार्च**

प्रथमेश अनिल उंबरे या बीएमएमच्या विद्यार्थ्याला

स्वप्ने मोफतच असतात, फक्त त्यांचा पाठलाग करताना आयुष्यात बरीच किंमत मोजावी लागते!

राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन लोकसत्ता वक्तृत्व स्पर्धा २०२० महाअंतिम फेरीत लालित्यपूर्ण शैलीसाठी प्रा. वसंत कुंभोजकर पुरस्कार प्राप्त झाला.

**२८ एप्रिल**

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे "Online Reference Management using Zotero" या विषयावर ज्येष्ठ ग्रंथपाल डॉ. शामप्रसाद पुजार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल नारायण बारसे व प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

मार्च २०२० मधील कार्यक्रम / वार्ता



२ मार्च : श्री. वैभव पंडित, प्रा. कृणाल के पुंजानी आणि डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी आंतरराष्ट्रीय उद्योजक डॉ. अशोक व्ही. जोशी यांचे 'तंत्रज्ञानातील उद्योजकता आणि नावीन्य' या विषयावरील अतिथी सत्र आयोजित केले.

४ मार्च : समर इंटर्नशिप प्लॅन २०२० संदर्भातील चर्चेसाठी प्रा. महेश भानुशाली यांनी फ्लिपकार्ट कंपनीच्या गोदामाला भेट दिली.

६ मार्च : सहयोगी प्रा. डॉ. स्मिता जपे आणि प्रा. दीपक अग्निहोत्री यांनी 'एज्युकेशन - अंडररायटिंग इंडिविज्युअल अँड नॅशनल इकॉनॉमी' या विषयावरील लेख महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिल डायजेस्ट या मासिकामध्ये प्रकाशित झाला.




६-७ मार्च : प्रा. कंचन अक्षय आणि प्रा. सिद्धेश सोमण यांनी क्रीडा समिती तर्फे डॉ. व्ही.एन. ब्रीम्समध्ये आंतरमहाविद्यालयीन क्रीडा महोत्सव एन्थुझिया २०२० चे आयोजन केले.




७ मार्च : डॉ. स्मिता जपे यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने डॉ. प्रीती शिरोडकर आणि श्रीमती मिनोती नाईक यांचे फाइंडिंग युअर झेन : लेसन्स फ्रॉम लाईफ, तसेच ताणतणाव व्यवस्थापन विषयावरील अतिथी सत्र आणि कार्यशाळेचे आयोजन केले. त्यांनी या कार्यक्रमांत वर्क लाइफ बॅलन्सचे महत्त्व विशद करून चक्रासन आणि प्राणायाम यांच्यासह श्वासोच्छ्वासाच्या व्यायामाचे प्रात्यक्षिक सादर केले.

---

जर तुम्ही नेहमीच सर्वसाधारण जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असालं, तर तुम्हाला कधीच हे उमजणार नाही की, तुम्ही किती असामान्य आहात!



७ मार्च : मुंबई विद्यापीठ आणि सस्मिरा वाणिज्य व विज्ञान संस्थेतर्फे संयुक्तपणे आयोजित एक दिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेत प्रा.महेश भानुशाली आणि द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी अपूर्वा मोरे यांनी जी.पी. पारसिक सहकारी बँकेच्या विशेष संदर्भाने 'ग्राहकांच्या समाधानावर सेवेचा परिणाम' या विषयावर शोध निबंध सादर केला.

९ मार्च : बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज आयोजित आंतरमहाविद्यालयीन ॲड मॅड कॉम्पिटीशन मध्ये आमच्या एमएमएसच्या विद्यार्थिनी कु. अदिबा मुकादम, कु. पूर्वा अजगावकर, कु. रेवती पदतुरे, कु. सायली पालव आणि कु. सायली वलांज यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.




१३ मार्च : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थी समितीच्या सहकार्याने ब्रीम्स कनेक्ट कार्यक्रमाचे आयोजन केले.



डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी श्री. राजेश शुक्ल यांच्या 'सर्वसाधारण-पुढाकाराच्या पलीकडे' या विषयावरील अतिथी सत्रांच्या समाप्ती सोहळ्याचे आयोजन केले.



१३ मार्च : प्रा. संदीप मोघे यांनी मॉर्निंगस्टार कंपनीबरोबर एकाचवेळी '८' ऑनलाइन थेट प्रक्षेपित (लाइव्ह व्हिडिओ) मुलाखतींचे एकत्रिकरण केले. एका दिवसात एकूण ३५ मुलाखती घेण्यात आल्या.

१४ मार्च : डॉ.स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी श्रीमती मुकुलिका यांना एसपीएसएसच्या सहाय्याने सांख्यिकीय साधने व तंत्राच्या क्षेत्रातील पीएचडी प्रबंध संदर्भात मार्गदर्शन सल्ला सेवा प्रदान केल्या.

प्रा. संदीप मोघे यांनी एमएमएस च्या द्वितीय वर्षाच्या मानव संसाधन शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'बहिःशाल उपक्रम' आयोजित केला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना वर्गात व्याख्याना दरम्यान शिकलेल्या वेगवेगळ्या संकल्पनांना मुक्त वातावरणात लागू करण्यास सांगण्यात आले.



१६ मार्च : डॉ. नीतिन जोशी यांना पीएचडी मुलाखत परीक्षेसाठी तज्ज्ञ परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.


१९, २० आणि २३ मार्च : प्रा. महेश भानुशाली यांनी मॉर्निंग स्टार कंपनीसाठी विद्यार्थ्यांच्या मुलाखती आयोजित केल्या. ‘कोअर फायनान्शियल रिसर्च अनॅलिस्ट’ पदासाठी मोहित जोशी, स्वपन चौधरी, प्रियंका गजघाटे, गौरी लोट, सुशांत जोंधळे, प्रवीण चिकणे, सुयश पाटील, ऋषिकेश तांबे. या ८ विद्यार्थ्यांची ३.५ लाखांचे पॅकेज देऊन निवड करण्यात आली.

२० मार्च : प्रा. कृणाल के पुंजानी यांनी एआयसीटीई मान्यता प्राप्त, एआरपीआयटी (अॅनुअल रीफ्रेशर प्रोग्राम इन टीचिंग) च्या एफडीपी चा भाग असलेला ऑनलाईन रिफ्रेशर कोर्स इन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम स्वयम प्लॅटफॉर्मवर यशस्वीरित्या पूर्ण केला.

२४ मार्च : डॉ. नीतिन जोशी यांनी विनिंग इन लाईफ या विषयावर आपले विचार ध्वनिचित्रफितीच्या (व्हिडिओ)च्या माध्यमातून सादर केले.

व्हिडिओचा दुवा (लिंक) https://www.facebook.com/VNBRIMS/videos/1117019935321349/

२५ मार्च : डॉ. स्मिता जपे, मॅक्ग्रा हिल प्रकाशना तर्फे आयोजित आणि ८ वित्त विषयक पुस्तकांचे प्रख्यात लेखक श्री. प्रसन्न चंद्र यांनी घेतलेल्या बिहेविअरल फिनान्स या विषयावरील वेबिनारमध्ये सहभागी झाल्या.




२७ मार्च : प्रा. संदीप मोघे यांनी कोविड १९ साथीच्या आपत्तिक स्थिती दरम्यान गुगल मीटचा उपयोग करून ऑनलाईन फॅकल्टी मीटिंगचे एकत्रिकरण केले.

३०-३१ मार्च : कोविड १९ साथीच्या आपत्तिक परिस्थितीत प्रा. संदीप मोघे यांनी वेबएक्सचा वापर करून एमएमएस व पीजीडीएमच्या वर्गासाठी ऑनलाईन व्याख्यानांचे एकत्रिकरण केले.

३० मार्च : प्रा. महेश भानुशाली यांनी कोविड -१९ च्या कठीण काळात संपूर्ण आभासी तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियाद्वारे मार्केटिंगच्या विद्यार्थ्यांसाठी ‘रिलायन्स जिओ’ कंपनीसाठी कॅम्पस भरती प्रक्रियेचे आयोजन केले आणि यामध्ये ३ लाखांच्या पॅकेजसह मोनिका दहिया, सिमरन डिसूझा, सृष्टी कामत, श्रावण कोटियन, हितेश डूंगरखिया, तन्मय मोघे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

३१ मार्च : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी वेबएक्स तंत्रज्ञान वापरून एमएमएस द्वितीय सत्राच्या विद्यार्थ्यांचे बिझनेस रिसर्च मेथडोलॉजी या विषयाचे ऑनलाईन सत्र घेतले.

टाळेबंदीच्या कालावधी दरम्यान प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी लिहिलेले विविध लेख -

यश हे सोपे कारण ते कशाच्या तरी तुलनेत असते. पण समाधान हे महाकठीण, कारण त्याला मनाचीच परवानगी लागते!

| प्राध्यापक व कर्मचारी यांचे नाव | विषय |
|---|---|
| डॉ. नीतिन जोशी | १. व्हॉट मोटिव्हेटस यू ?<br>२. नीड टू डिस्कवर अवर ॲबिलिटीस<br>३. अनफोल्डिंग द हिडन गोल<br>४. विनिंग इन लाईफ |
| डॉ. श्रीधरन | १. सोशल डिस्टंसिंग |
| डॉ. स्मिता जपे | १. इम्पॅक्ट ऑफ कोविड १९ ऑन इकॉनॉमी :- विल इकॉनॉमिक प्रॉब्लेम बी सॉल्व्हड बाय गव्हर्नमेंट विथ सपोर्ट फ्रॉम कार्पोरेट्स इन इंडिया इंक ? |
| प्रा. अर्लोफ जॉन व्हिएरा | १. प्रिव्हेंशन इज बेटर द्यान क्युअर : करोना व्हायरस वॅक्सीन अवेलिबिलिटी<br>२. सप्लाय चेन डिस्ट्रिब्यूशन अँड चॅलेंजेस अहेड<br>३. व्हॅल्यूज इन लाईफ |
| डॉ. पल्लवी चांदवसकर | १. इंनोव्हेशन्स इन द टाइम ऑफ कलॅमिटी |
| डॉ. मीनाक्षी मल्होत्रा | १. अ रिव्ह्यू आर्टिकल ऑन स्टक मार्केट क्रॅशेस<br>२. मॅनेजमेंट लेसन्स फ्रॉम रामायण |
| प्रा. महेश भानुशाली | १. पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांचे क्रांतिकार्य |
| प्रा. कंचन अक्षय | १. स्टे पॉझिटिव्ह, स्टे हेल्दी !<br>२. चेंज विथ ॲजिलिटी: नीड ऑफ ॲन आवर फॉर बिजनेसेस |
| प्रा. विभूती सावे | १. Remote माणसाचा, Control निसर्गाचा. |
| प्रा. दीप्ती पेरिवाल | १. डायल डी फॉर डिस्ट्रपटिव्ह बिजनेस स्ट्रॅटेजीज इन डिफिकल्ट टाइम्स कोविड १९ |
| प्रा. कृणाल के पुंजानी | १. लिंकिंग भगवद गीता प्रिन्सिपल्स विथ स्पोर्टस<br>२. रायजिंग फ्रॉम द ॲशेस विथ द ग्रोथ माइंडसेट |
| प्रा. शेखर व्ही. | १. करिअर अपॉर्च्युनिटीज फॉर ऑपेरेशन मॅनेजमेंट स्टडीज |
| प्रा. सिद्धेश सोमण | १. द सायकॉलॉजिकल इम्पॅक्ट ऑफ करोना व्हायरस पॅनडेमिक ऑन इंडियन स्टॉक मार्केट |
| श्री. संजय सपकाळ | १. आजचे भीषण वास्तव<br>२. जगण्यात मौज आहे! |

प्रत्येक पाऊल योग्य नसते, पण धोके पत्करून त्यातून जे शिकत जातात ते ध्येय नक्की गाठतात.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

संस्कृतीच्या अभ्यासाकरिता एशियाटिक सोसायटीची स्थापना केली. चार्ल्स विल्किन्स (Charles Wilkins), अलेक्झांडर हॅमिल्टन (Alexander Hamilton), हेन्री कुलब्रुक (Henry Colebrooke) हे सर्व या संस्थेचे सभासद तर होतेच, पण संस्कृतच्या प्रसार व प्रचाराचेही महत्त्वाचे काम या सर्वांनी पुढे केले. अनेक संस्कृत ग्रंथांचे इंग्रजी भाषांतर करून भारतीय संस्कृतीची ओळख त्यांनी पाश्चात्य जगताला करून दिली. भारतीय संस्कृतीचा सर्वांगीण आणि तौलनिक अभ्यास याच काळात सुरू झाला. म्हणूनच संस्कृत भाषा आणि भारतीय संस्कृतीचा तो पुनरुत्थानाचा काळ होता (Oriental Renaissance), असं म्हटलं तर गैर होणार नाही.

रॉबर्ट क्लाइव्ह प्रमाणे वॉरन हेस्टींगवरही इंग्लंडमध्ये १७८८ साली खटला चालू झाला. भारतामधील प्रशासकीय गैरव्यवहार, आणि भ्रष्टाचाराचे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले. एडमंड बर्क (Edmund Burke) हे प्रसिद्ध तत्त्वज्ञ त्याचे एक शिल्पकार होते. त्यांच्यावरचे आरोप पत्र ते चार दिवस वाचत होते. इंग्लंडच्या लोकसभेमध्ये हा खटला सात वर्षे चालला. हेस्टिंग यांच्यावरील आरोप सिद्ध न झाल्यामुळे त्यांची निर्दोष सुटका झाली.

वॉरन हेस्टींग हे ईस्ट इंडिया कंपनीचे प्रतिनिधी होते. साहाजिकच कंपनीच्या उत्कर्षाला ते बांधील होते. संस्कृत भाषा आणि भारतीय संस्कृतीबद्दल त्यांच्या मनात प्रचंड आदर होता. 'माझ्या देशापेक्षा जास्त मी भारतावर प्रेम करतो' हे त्यांचं विधान प्रसिद्ध आहे. विल्किन्सच्या भगवद्गीतेच्या भाषांतराला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना हा याचा एक उत्कृष्ट नमुना आहे.

It is not very long since the inhabitants of India were considered by many, as creatures scarce elevated above the degree of savage life; nor, I fear, is that prejudice yet wholly eradicated, though surely abated. Every instance which brings their real character home to observation will impress us with a more generous sense of feeling for their natural rights, and teach us to estimate them by the measure of our own. But such instances can only be obtained in their writings, but these will survive when the British Dominion in India shall have long ceased to exist, and when the sources which it once yielded of wealth and power are lost to remembrance.

रॉबर्ट क्लाइव्ह, वॉरन हेस्टींग किंवा वर उल्लेख केलेले अनेक इंग्रज हे ईस्ट इंडिया या व्यापारी कंपनीचे अधिकारी होते. व्यापार आणि त्यांच्या अनुषंगाने येणारी उलाढाल एवढ्यापुरते त्यांचे कार्यक्षेत्र सीमित होते. पण तरीही त्यांनी भारतीय भाषा, संस्कृती, जीवनपद्धती, व्यवहार यांचा कसून अभ्यास आणि संशोधन केले.

भारतीय समाज आणि त्याची संस्कृती ही मागासलेली, अंधश्रद्धेने भरलेली, अविकसित संस्कृती आहे असेच भारताबद्दलचे मत, तत्कालीन प्रवासी, धर्मप्रसारक आणि अभ्यासकांचे होते. साहाजिकच यामध्ये 'वर्णवाद' आणि 'वंशवादा'चा एक दर्प होता. ऐहिक आणि पारमार्थिक जगतात पाश्चात्य म्हणजे ग्रीक किंवा रोमन संस्कृतीपेक्षा विकसित अशी मानवी संस्कृती जगात असू शकते यावर त्यांचा विश्वास नव्हता.

प्रबोधनयुगामुळे (Renaissance) ख्रिश्चन धर्माचा पाश्चात्यांवरचा पगडा कमी होऊन निसर्ग आणि जीवनाकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन त्यांच्यामध्ये विकसित होत होता. याचेच प्रतिबिंब त्यांचे साहित्य, कला, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनशैलीमध्ये पडत होते. अठराव्या शतकातील उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकात भारतात येणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांवर कमी-अधिक प्रमाणात या विचारसरणींचा

प्रभाव होता. पण त्यामध्ये एक छुपा वर्चस्ववादही होता. यातूनच आपल्या व्यतिरिक्तच्या भारतासारख्या अनेक संस्कृती ज्या अविकसित आहेत त्यांचा विकास करणे, त्यांच्यामध्ये सुधारणा करणे, हे आपले इतिकर्तव्य आहे, या पूर्वग्रहांनीच ते भारतात येत होते. यात अनेक धर्मप्रसारकही होते. भारतीय संस्कृतीची उंची, खोली आणि आवाका बघून यांच्यापैकी अनेकांचा त्यांच्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाबद्दल भ्रमनिरास होत होता. भारतीय संस्कृती आणि संस्कृत भाषेचा अभ्यास करताना, त्यांच्या या गोंधळलेल्या मनःस्थितीचा प्रभाव त्यांच्या संशोधनपर लिखाणात पडणे नैसर्गिक होते. वर उद्धृत केलेल्या वॉरन हेस्टींगच्या लिखाणामध्ये त्याचे प्रतिबिंब स्पष्ट आहे. यावर आज शेकडोंनी संशोधनपर निबंध आणि पुस्तके उपलब्ध आहेत.

वॉरन हेस्टींगच्या संस्कृत आणि भारत प्रेमाची ही पार्श्वभूमी आहे. तो वसाहतवादी असला तरी भारतीय संस्कृतीचा हितचिंतक होता. विल्किन्सच्या भगवद्गीतेच्या भाषांतराला प्रस्तावना लिहूनच तो थांबला नाही, तर ईस्ट इंडिया कंपनीतर्फे त्यांनी ते प्रकाशितही केले. हलहेड (Halhed) या तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्याला वॉरन हेस्टींगने बंगाली भाषेचे व्याकरण लिहायला लावले. म्हणूनच, विल्यम जोन्स प्रमाणेच, संस्कृत भाषेच्या पुनरुत्थानाकरिता वॉरन हेस्टींग यांनाही आपण तेवढेच धन्यवाद द्यायला हवेत. संस्कृत भाषेचे महत्त्व हे, त्यामध्ये असलेल्या प्रचंड ज्ञानभांडारामुळे; २५० वर्षांपूर्वी साम्राज्यवादी वॉरन हेस्टींगने जेवढे ओळखले होते, तेवढे महत्त्व स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे होऊनही आपण आज ओळखू शकत नाही हीच आपली एक मोठी शोकांतिका आहे.

**– डॉ. विजय बेडेकर**

•••

## मला सवय नाही ...

जेव्हा बहरलेल्या झाडावर पक्षी अचानकपणे फिरकत नाहीत अशा झाडाची मला सवय नाही...

तरुणाईचा जल्लोष नाही, ना तरुणाईंची लगबग.. अशा महाविद्यालयाची मला सवय नाही...

कॅन्टीनमध्ये ना सततची बडबड आणि ना मैत्रीची मैफिल अशा कॅन्टीनची मला सवय नाही...

विद्यार्थ्यांची नाही कुजबुज, नाही ओळखपत्र विचारायची संधी अशा अनियमित सुरक्षेची मला सवय नाही...

बाकं खाली, ग्रंथालयं रिकामी आणि नाही फळ्यांचा वापर अशा वर्गांची मला सवय नाही...

महाविद्यालयाच्या पायऱ्यांवर सतत होणारी विद्यार्थ्यांची वर्दळ, ना त्यांची गजबज, ना त्यांचा कल्ला अशा ओसाड पडलेल्या त्या महाविद्यालयांच्या पायऱ्यांची मला सवय नाही....

काही दिवसांपासून ना कुठल्या शिक्षकाची तक्रार, ना कुठल्या विद्यार्थ्याला पकडून मस्ती करण्याचा जाब विचारणे.. अशा ओस पडलेल्या ज्ञानद्वीपाची मला सवय नाही...

शिक्षक वृंद नाही, नाही शिक्षकेतर कर्मचारी अशा मोकळ्या विप्रमंच्या इमारती व महाविद्यालय परिसराची सवय आपल्या मोठ्या डॉक्टरांना नाही...

खरंतर कोरोनामुळे उद्भवलेली परिस्थिती लवकरात लवकर निवळून, परत आपले मोठ्या डॉ. साहेबांच्या कुशीत विस्तारलेला महाविद्यालय परिसर तरुणाईने बहरू दे आणि शिक्षकांच्या ज्ञानगंगेला निथळपणे वाहू दे ...ज्याची सवय सगळ्यांना आहे...

**– स्वप्नील नंदकुमार मयेकर**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.